**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे


फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)

चला जाऊया पूर्व विदर्भ पर्यटनाला
बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक १६ | बुधवार,दि.२४ मार्च २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

## शिक्षक भरतीच्या भ्रष्टाचाराची चौकशी सुरु

**गोंदिया:** पदभरती बंद असतानाही गोंदिया जिल्ह्यातील खासगी अनुदानित शाळांमध्ये सुमारे २५० शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी ३१ तक्रारी दाखल झाल्या आहेत. शिक्षक आमदार, शिक्षक संघटनाही याविरोधात आक्रमक झाल्या आहेत. सरकारी शाळांमधील विद्यार्थी


कार्यालय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
बालभारती, धंतोली गार्डन जवळ, धंतोली, नागपूर- ४४००१२
Website : www.dydenagpur.org
फोन. नं. ०७१२-२४२२३९८, ईमेल, dydnagpur@rediffmailcom, dd.nagpur@mahedu.gov.in
क्र.शिउसं/माध्य-ड/चौकशी/ १८७० /२०२१
दिनांक :- 19 MAR 2021

प्रति,
अधिक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक)
गोंदिया

विषय:- शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया येथे झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन दोषीवर कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ:- श्री व्ही. के. खांडके, शिक्षण सहसंचालक, (प्रशासन,अंदाज व नियोजन), कार्यालय, शिक्षण आयुक्तालय, म. रा. पुणे यांचे पत्र क्र. आस्था-अ १०३/तक्रार/फेब्रुवारी/२०२१/९५५ दिनांक २२.०२.२०२१

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सुचित करण्यात येते की, वरील संदर्भिय पत्रान्व्ये श्री मनोज नेर्लेकर, वाचक पोलीस उपअधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक ०१.०१.२०२१ अन्वये श्री सुरेश डोमनसिंग माच्छिरके, मु.पो. कावराबांध ता. सालेकसा जि. गोंदिया यांचे पत्र दिनांक १३.११.२०२० नुसार श्री एस. जी. मांढरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. गोंदिया यांचे विरुध्द भ्रष्टाचारीची चौकशी करुन दोषीवर कार्यवाही करण्याबाबत शिक्षण आयुक्तालयाकडून कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार आपल्या कार्यालयास प्राप्त असलेल्या सन २०१७-१८ ते सन २०१९-२० मध्ये श्री एस. जी. मांढरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. गोंदिया यांनी दिलेल्या सर्व वैयक्तिक मान्यतेबाबतचे आदेशाची छायांकित प्रत तसेच सर्व सदर प्रकरणाबाबच्या संबंधित शाळांची नावे व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पदनामसह नावांची यादी Exelsheet व DV-TTSurekh या फॉन्ट मध्ये तयार करुन सदर माहितीची स्फॉटकॉपी व हॉर्डकॉपी आपले खास दुतामार्फत या कार्यालयात समक्ष सादर करावी.

(डॉ. वैशाली जामदार)
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग,नागपूर

प्रतिलीपी –
१) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, म.रा. पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्य.), म.रा. पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

संख्या रोडावल्याने शिक्षक अतिरिक्त ठरत असताना शिक्षणाधिकारी कार्यालयाने या पदभरतीला मान्यता दिली, हे विशेष.राज्यभरातील भरती प्रक्रिया बंद असताना गोंदिया जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने मोठ्या प्रमाणात रक्कम घेऊन शिक्षकांना नियुक्तीपत्र दिले आहे. या प्रकरणाची चौकशी गडचिरोली-गोंदिया पोलीस विभागाचे उपमहानिरिक्षक संदिप पाटील यांनी ताब्यात घेतली असून त्यांनी सखोल चौकशी सुरु केली आहे.त्यातच एसीबीकडे गेलेल्या तक्रारीच्या आधारावरुन दोषींवर कारवाई करण्यात यावी असे पत्र शिक्षण उपसंचालक डॉ. वैशाली जामदार यांनी अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) यांना १९ मार्च रोजी दिलेल्या पत्रातून म्हटले आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाने मोठ्या प्रमाणात रक्कम घेऊन खासगी अनुदानित शाळातील रिक्त जागा भरण्यास मान्यता दिली. शिक्षकांना मान्यता देऊन त्यांचे वेतन सुरू केले. या संदर्भात मनोज नेर्लेकर पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र यांच्याकडे १ जानेवारी २०२१ रोजी तक्रार करण्यात आली होती.सालेकसा तालुक्याच्या कावराबांध येथील सुरेश डोमनसिंग मच्छीरके यांनी तक्रार केली होती. तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी एस.जी.मांढरे यांनी दिलेल्या सर्व वैयक्तिक मान्यतेबाबतच्या आदेशाची छायांकित प्रत शाळा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे पदनामासह नागपूर उपसंचालक कार्यालयात पाठविण्यास सांगितले आहे.सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या तीन वर्षाच्या काळात मांढरे यांनी दिलेल्या सर्व नियुक्त्यांची माहिती देण्यात यावी,असे पत्रात म्हटले आहे. त्यानुसार २२ मार्च रोजी नागपूर शिक्षण उपसंचालक कार्यालयातील एका अधिकाऱ्याने वेतन पथक कार्यालय व शिक्षणाधिकारी कार्यालयातून या संबंधातील रेकार्ड घेवून गेल्याची माहिती समोर आली आहे.

### एसीबीसीचे शिक्षण उपसंचालकांना पत्र

राज्य सरकारने २ मे २०१२पासून शिक्षक पदभरतीवर बंदी घातली. गरज पडल्यास काही विशिष्ट अटींच्या आधीन राहून भरतीला परवानगी देण्याची भूमिका घेतली.

मात्र, अटींची कोणतीही पूर्तता न करता गोंदिया जिल्ह्यातील ५३ शाळांमध्ये शिक्षक भरती करण्यात आल्याचा दावा तक्रारींमधून करण्यात आला आहे. आजवर २०१८-१९ व २०१९-२० या सत्राची संचमान्यता मिळालेली नाही. त्यामुळे नेमके किती शिक्षकांची पदे रिक्त आहेत हे स्पष्ट होऊ शकलेले नाही. विभागीय आयुक्त मागासवर्गीय विभाग ( कक्ष) यांच्याकडून बिंदूनामावलीचे परीक्षण करण्यात आले नाही. अशा परिस्थितीमध्ये शिक्षक मान्यता व शालार्थ आयडी देऊन गोंदिया, नागपूर, चंद्रपूरसह काही जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाने शासकीय नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. या पदभरतीसाठी आधार म्हणून वापरण्यात आलेले पत्रही संशयास्पद असल्याची चर्चा आहे. या प्रकरणाची तक्रार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, शिक्षण संचालकांकडे करण्यात आली आहे. विशेष चौकशी समिती नेमून घोटाळ्याचा पर्दाफाश करण्याची मागणी शिक्षक आमदार नागो गाणार, विदर्भ शिक्षक संघ, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघासह अनेक संघटनांनी केली होती.मात्र राज्यातील सर्वच राजकीय पक्षाचे नेते,सरकारमधील मंत्री आणि विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी सुध्दा या प्रकरणात गप्प असल्याचे दिसून येत आहे.

## ४ जहाल नक्षलवाद्यांनी गडचिरोली पोलिसांसमोर केले आत्मसमर्पण

**गडचिरोली :** पोलिसांपुढे चार जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले शासनाने या चौघांवर एकूण २२ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून वरिष्ठ नक्षली नेत्यांसह अनेक जहाल नक्षल्यानी आजपर्यंत आत्मसमर्पण केले आहे. त्याचबरोबर आत्मसमर्पितांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवून आणल्यामुळे ही संख्या वाढत आहे.वर्षभरात विविध चकमकीत माओवाद्यांचा झालेला खात्मा तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळुन नुकतेच २२ लाख रुपये बक्षीस असलेल्या ४ जहाल नक्षलवाद्यांनी पोलिस अधिक्षक अंकीत गोयल




यांच्यापुढे आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ३ पुरुष आणि १ महीला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यामध्ये भामरागड एरीया कमांडर दिनेश उर्फ दयाराम मंगर नैताम , सेक्शन ३ चा कमांडर नकुल उर्फ सुखालुराम डुमा मडावी, कसनसुर दलम सदस्या निला स्त्री कुमरे व झोन टिडीला पिपीसीएम पदावर कार्यरत शरद उर्फ रमेश उर्फ गोविंदा सामजी आतला यांचा समावेश आहे.यामध्ये नकुल मडावी आणि निला कुमरे हे पती-पत्नी आहेत. आत्मसमर्पित नक्षल्यापैकी दिनेश नैताम याच्यावर २० गुन्हे दाखल असुन शासनाने ८ लाखांचे बक्षिस जाहीर केले होते. नकुल महावी याच्यावर १९ गुन्हे दाखल असुन ८ लाखांचे बक्षिस जाहीर केले होते. निला स्त्री कुमरे हिच्यावर १० गुन्हे दाखल असुन २ लाखांचे बक्षिस जाहीर केले होते.तर शरद सामजी आतला याच्यावर ८ गुन्हे दाखल असुन त्याच्यावर ४ लाखांचे बक्षिस जाहीर करण्यात आले होते.या सर्वांनी पोलिस अधिक्षक अंकीत गोयल यांच्यापुढे आत्मसमर्पण केले आहे. जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास इच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल अशी माहिती पोलिस अधिक्षक अंकीत गोयल यांनी दिली.

## गोंदियात ४८ रुग्ण

**गोंदिया :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून३ मार्च रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे ४८ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले. १५ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना आज सुट्टी देण्यात आली आजपर्यंत १५,१९२ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. १४,४७५ रुग्णांनी आतापर्यत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ५३० आहे. ४०५ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील १८७ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९५.६७ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२० टक्के आहे तर डब्लिंग रेट ३८०.२ दिवस आहे.

**भंडारा:-** जिल्ह्यात आज ६५ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. बरे झालेल्या रुग्णांची संख्या १३९२८ झाली असून आज १९८ नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत. पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या १५४०२ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९०.४३ टक्के आहे.आज २२२९ व्यक्तींच्या घशातील स्त्रावाचे नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी १९८ व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत.

## अखेर बिरसी विमानतळ प्रकल्पातून डीजीआर रद्द

**गोंदिया :** मागच्या दोन महिन्यापासून डीजीआर (सैनिक पुनर्वसन) रद्द करून पुन्हा कामावर घेण्यात यावे या मागणीसाठी बिरसी विमानतळातील कामावरून कमी केलेल्या सुरक्षारक्षक आंदोलनाला बसले आहेत. अखेर सुरक्षारक्षकांची मागणी मान्य करून बिरसी विमानतळातून डी जी आर पूर्णतः रद्द करण्यात आले. तशी माहिती केंद्रीय रिसेटलमेंट विभागाकडून संघटनेला पाठवलेल्या ई-मेल पत्रातून देण्यात आली आहे. या विमानतळ प्रकल्पातून आता डी जी आर रद्द झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना सुरक्षारक्षक म्हणून कामावर घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मागच्या तेरा वर्षापासून सुरक्षारक्षक म्हणून काम करीत असलेल्या स्थानिक सुरक्षा रक्षकांना डीजीआर चा अवलंब करित विमानतळ प्रशासनाने कामावरून पूर्णतः बंद केले होते. आपल्याला पुन्हा कामावरून घेण्यात यावे, म्हणून या सुरक्षा रक्षकांनी मागच्या दोन महिन्यांपासून विमानतळ गेट समोर आपल्या कुटुंबा समवेत आंदोलनाला सुरुवात केली आहे. आपल्याला न्याय मिळावे म्हणून त्यांनी स्थानिक सहघटना पासून तर आमदार, खासदार, तसेच केंद्रीय शासना पर्यत याचना केली होती. तसेच महामहिम राष्ट्रपती महोदयाकडे शुद्धा इच्छा मृत्यु ची मागणी केली होती हे विशेष. नुकतीच पंतप्रधान कार्यालयाने शुद्धा या आंदोलनाची दखल घेत सदर प्रश्न तात्काळ सोडविण्याची सूचना केली होती. सदर अन्याय ग्रस्त सुरक्षा रक्षकांना न्याय मिळावा म्हणून स्थानिक आमदार विनोद अग्रवाल, खासदार सुनील मेंढे, खासदार प्रफुल पटेल यांनी आपली शक्ती पणाला लावून सदर प्रश्न दिल्ली दरबारी उचलुन धरला होता हे विशेष. त्यांनी घेतलेल्या जनहिताच्या पवित्र्यामुळेच अखेर या विमानतळ प्रकल्पातून डिजीआर कायमस्वरूपी संपुष्टात आणण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर सध्या सुरू असलेले डिजीआर प्रायोजित सुरक्षा कंत्राट सुद्धा रद्द करण्यात आले अशी माहिती रिसेटलमेंट विभागाकडून देण्यात आली आहे.

# ओबीसींच्या राजकीय आरक्षणाबाबत कुणीच गंभीर नाही?




**गोंदिया:** जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींमध्ये देण्यात आलेले ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण सवीच्च न्यायालयाने अवैध ठरवले. त्यामुळे अनेकांचे पद गेले. परंतु ओबीसींचे हे आरक्षण वाचवण्यासाठी राज्य सरकारने अद्याप पावले उचललेली नाहीत.

सर्वोच्च न्यायलयाने एका याचिकेवर सुनावणी करताना ४ मार्चला अंतिम आदेश दिला. त्या आदेशानंतर राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सहा जिल्हा परिषदा आणि २७ पंचायत समितींमधील बीसीसी (नागरिकांचा मागास प्रवर्ग, ओबीसी अधिक इतर काही प्रवर्ग) सदस्यांची निवडणूक रद्द करण्याचे आदेश दिले. त्यामुळे सरसकट ओबीसींच्या सर्व जागांवर निवडणूक होऊन त्या सर्व जागा खुल्या प्रवर्गासाठी राखीव होणार आहेत. यामुळे ओबीसी समाजात नाराजी आहे.

न्यायालयाचा निर्णय आला तेव्हा राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होते. यावर तोडगा काढण्यासाठी विधानसभा अध्यक्षांच्या कक्षात सत्ताधारी आणि विरोधी पक्षनेते यांच्यात बैठक झाली. या विषयावर सभागृहात देखील चर्चा झाली. मात्र, अधिवेशन संपले तरी सरकार शांतच आहे. सवीच्च न्यायालयात फेरविचार याचिका किंवा दुरुस्ती याचिका देखील राज्य सरकारने अद्याप दाखल केलेली नाही. त्यामुळे राज्य सरकार ओबीसींच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाबाबत खरच गंभीर आहे काय, असा सवाल राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी उपस्थित केला आहे.

राज्य सरकार स्वत: याबाबत काहीच करीत नसल्याने नागपूर जिल्हा परिषदेच्या सदस्या अवंतिका लेकुरवाळे यांनी दुरुस्ती याचिका दाखल केली. त्यांनी सरसकट सर्व जागांवर निवडणूक न घेता, अतिरिक्त जागांवर निवडणूक घेण्याची विनंती या याचिकेत केली आहे. ओबीसींच्या १६ जागांपैकी केवळ चार जागांवर निवडणूक घेण्याची त्यांची विनंती आहे.

राज्य सरकारने ओबीसींचे आरक्षण घालवल्याचा आरोप माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. शिवाय त्यांनी सरकारने सवीच्च न्यायालयाला वेळ मागून ओबींसींची स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षित जागा सुरक्षित करण्यासाठी तातडीने आयोग स्थापन करावा आणि ओबीसींचा गावनिहाय टेडा तयार करावा, अशी मागणीही केली आहे.

**ओबीसी नेत्यांनो पक्षभेद विसरून एकत्र या**



सवीच्च न्यायालयाच्या अलीकडच्या निर्णयामुळे ओबीसी समाजाचे फार नुकसान झाले आहे. न्यायालयाने ओ[illegible] आरक्षण रद्द केल्याने आपल्या समाज[illegible] सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्[illegible] प्रगतीला खीळ बसणार आहे. या नि[illegible] अत्यंत दूरगामी प्रतिकूल परिणा[illegible] आपल्या ओबीसी समाजाला भोगावे लागणार आहे. सर्वच क्षेत्रातून ओबीसी नेतृत्व नष्ट करण्याचा हा घाट आहे.

माझी सर्व राजकीय पक्षातील ओबीसी लोकप्रतिनिधी, नेते, पदाधिकारी यांना हात जोडून विनंती आहे की, अजूनही वेळ गेलेली नाही. आपण आपले सर्व पक्षीय मतभेद विसरून ओबीसी समाजासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. राज्यातील महाविकास आघाडी सरकारने ओबीसी आरक्षणाचा कायदा तातडीने मंजूर करावा. तसेच राज्य सरकारने ओबीसी आयोग तयार करून जिल्हा व गावनिहाय माहिती अद्ययावत करावी. यानंतर महाराष्ट्र सरकारने सर्वोच्य न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, अशी मागणी आपण सर्वांनी सरकारकडे केली पाहिजे. त्यासाठी सरकारवर आपण दबाव वाढविला पाहिजे. प्रसंगी संघर्षासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी दाखविणे सर्वांसाठीच आवश्यक आहे.

**डॉ.परिणय फुके,** विधान परिषद सदस्य भंडारा-गोंदिया



राज्य निवडणूक आयोगाने सहा जिल्हा परिषदेतील ओबीसी आरक्षण रद्द केल्याने ओबीसी आरक्षणावर गंडांतर तर येणार नाही अशी भीती राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

गोंदिया जिल्ह्याची एकुण लोकसंख्या १० लक्ष ८२ हजार २७० आहे. यात १ लक्ष ३२ हजार ८८ अनुसूचित जाती व १ लक्ष ९८ हजार १९५ अनूसूचित जमाती मतदार आहेत. एकुण ५३ सदस्यातून सर्वसाधारण २३ व यातील १२ महिला असतील. अनुसूचित जाती ६ यातील ३ महिला, ओबीसी १४ यातील ७ महिला, अनुसूचित जमाती १० यातील ५ महिला याप्रमाणे आरक्षण होते. आता अनुसूचित जाती ६ यात महिला ३, जमाती १० यात महिला ५ व सर्वसाधारण ३७ यात महिला १९ याप्रमाणे आरक्षण राहू शकते. दरम्यान जिल्हा निवडणूक विभागाचे प्रभारी उपजिल्हाधिकारी एस.एन.चौधरी यांना विचारणा केली असता त्यांनी गोंदिया जिल्हा परिषद निवडणूक व आरक्षण संदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप कुठलेही निर्देश आले नसल्याचे सांगितले.



महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील १२ (२) मध्ये जिल्हा परिषदेच्या एकुण जागापैकी २७ टक्के जागा ओबीसी प्रवर्गासाठी राखून ठेवायच्या आहेत. मात्र सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण कलम रद्द केल्याने ओबीसींसाठी एकही जागा राहणार नाही, हे धक्कादायक आहे. सरकारने मराठा समाजाला ज्या पद्धतीने आरक्षण देण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. त्या पद्धतीनेच ओबीसी आरक्षणासाठी प्रयत्न करावे. यासाठी ओबीसी प्रवर्गातील लोकांनी दबावगट निर्माण करण्याची गरज आहे. सोबतच आदिवासी व मागासवर्गीय समाजाची स्वतंत्रपणे जशी जनगणना केली जाते. त्याच पद्धतीने सरकारने ओबीसीची जनगणना केल्यास प्रश्न निकाली निघू शकतो. ओबीसी आरक्षण हे भीक नव्हे तर राज्य घटनेने दिलेला अधिकार आहे. तो अधिकार मिळविण्यासाठी सर्वांनी ताकदीने उतरणे गरजेचे आहे. राज्य शासनाने ओबीसी आरक्षण कायम ठेवण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी जि.प.सदस्य गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसींना असलेले आरक्षण निरस्त करण्याचा निकाल लागल्यावर सर्वच पक्षांतील ओबीसी नेते खडबडून जागे झाल्याचा आव आणतांना दिसतात.पण खरंच यांनी ओबीसींची जणगणना व्हावी व शासनप्रशासनात ओबीसींना संख्येप्रमाणात प्रतिनिधित्व मिळावेत म्हणून असलेले संवैधानिक अधिकार मिळविण्यासाठी किती प्रयत्न केलेत? हे तपासले तर ओबीसी विरोधी निर्णयात त्यांची कर्तुत्वहिनता सिध्द होतांना दिसते. एकीकडे सवर्णांना जनगणनेची आकडेवारी नसतांना आरक्षण दिले जाते आणि ओबीसीं १९३१ च्या जनगणने आधारावर दिलेले २७% अर्धवट आरक्षण सुध्दा नाकारले जाते. यावरून ओबीसींनी धडा घ्यायला हवा व नुसते चापलूसीचे राजकरण करण्याऐवजी ओबीसी जनगणनेचा लढा लढावा व सोबतच ओबीसी जातीत ओबीसी मती निर्माण करण्याचा प्रबोधनात्म कार्य करून समाज निर्मीतीच्या प्रक्रियेत योगदान द्यावे,तेव्हाच ओबीसी म्हणून अस्तीत्व आहे.

**सावन कटरे,** संघटन सचिव,ओबीसी सेवासंघ



ओबीसीच्या स्थानिक स्वराज संस्था मधील जागा कमी करणे हे एक मोठे षड्यंत्र आहे. जनगणना नाही म्हणून आरक्षण रद्द करणे हा कुठला न्याय आहे आणि ओबीसी ६७% समाज हा ज्वलंत प्रश्न असताना देखील मेल्याचे सोंग घेऊन गार पडलेला आहे. ओबीसीचे तारणहार म्हणून मिरवणारे नेते सुध्दा मूग गिळून बसले आहेत ओबीसीचे उदयाचे राजकीय भविष्य या निकालामुळे अंधकारमय झालेले आहे. प्रत्येक ओबीसींनी यासाठी पेटून उठले पाहिजे.

**डॉ सुवर्णा हुबेकर,** तेली ओबीसी महिला समाज आघाडी गोंदिया



आता पर्यंत ओबीसींना जे २७ टक्के आरक्षण दिले जात होते. ते सुद्धा हे हक्क नाकारतांना न्यायालयाने कुठल्या आधारावर दिले जात होते, हे सांगायला हवे होते. परंतु तसे सांगण्यात आलेले नाही. सरकार ओबीसींची जनगणना करीत नाही. मग आमची संख्या कशी कळणार? एक तर न्यायालयाने सरकारला ओबीसी जनगणना करण्याचे सक्त निर्देश दयावे, सोबतच जो पर्यंत जनगणना होत नाही तोपर्यंत राज्य घटनेच्या तरतुदीनुसार सध्या ज्या प्रमाणे आरक्षण दिले जात होते त्याप्रमाणेच देण्यात यावे, अन्यथा ओबीसी समाजाला याकरिता आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागेल.

**रमेश अंबुले,** माजी शिक्षण व आरोग्य सभापती जि.प.गोंदिया



सर्वात मोठ्या ५२ टक्के संख्येने असलेल्या ओबीसींची आता जनगणना हाच एकमेव पर्याय आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सवीच्च न्यायालयाने ५० टक्के चे वर आरक्षण नको यावर शिक्कामोर्तब केले. राज्य सरकारने तात्काळ यावर पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयात टाकावेत. ओबीसी चे आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती एवढेच नव्हे तर सरपंच पदासाठी आता भविष्य टांगणीला टाकले आहे. हीच स्थिती समोर नोकरी पेशात अवलंबतील काय अशी भीती ओबीसींना वाटू लागली आहे. लोकसंख्येच्या तुलनेत आरक्षण मिळावे यासाठी वज्र मुठ तयार करणे गरजेचे आहे. जनगणनेत अद्यापही केंद्र सरकारने ओबीसींचा कॉलम तयार केला नाही. घटनादत्त अधिकार आपणास मिळत नसेल तर जन गणनेत आमचा सहभाग नाही असा निर्धार प्रत्येक ओबीसींने करणे गरजेचे आहे.

**उध्दव मेहेंदळे ,** अर्जुनी-मोरगाव



माननीय सुप्रीम कोर्ट यांनी नुकताच ओबीसीचे आरक्षण रद्द ठरवून संपूर्ण आरक्षण ५०% चे वर जात असल्यामुळे ओबीसींचे जिल्हा परिषद,नगरपंचायत, पंचायत समित्या व ग्रामपंचायत यामधील ओबीसीचे आरक्षण कमी केलेले आहे.यामुळे निश्चितच ओबीसी वर्गात निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. देशाच्या इतिहासात आज पर्यत ओबीसी जनगणना झालेली नाही शेळ्या मेंढ्या मांजरा कुत्र्यांची शासन जनगणना करत. मग ओबीसी जनगणना का होत नाही मुळातच सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी आज पर्यत ओबीसी जनगणना केली नाही.त्यामुळे अशा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आला निश्चितच या निर्णयामुळे ओबीसींमध्ये निराशा आलेली आहे.यावर उपाय ओबीसींची जातनिहाय जनगणना असून जनगणनी झालीच पाहिजे यासाठी ओबीसीनी या मुद्द्यावर कायमस्वरूपी संघटीत होऊन लढा देण्याची नितांत गरज आहे. ह्या लढ्यासाठी सर्व राजकीय पुढारी तसेच ओबीसी बांधवांनी एकत्र येणे काळाची गरज आहे.

**अशोक लंजे,** सचिव गोंदिया जिल्हा ओबीसी कृती समिती

## संपादकीय

### रश्मी शुक्ला यांची वकिली "तो"पुन्हा येण्यासाठी ?

राज्यातील सत्ता अस्थिरता नाट्यावर बोलताना ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे सांगतात परमवीर एकटे नाहीत, अशा वीरांची मोठी फौज भाजपकडं आहे. तेव्हा, सावध राहा... नाहीतर तो पुन्हा येईल... आणि त्यानंतर काय होईल याचा तुम्हीच विचार करा एक दृश्य परमवीर... बाकी छुपे वीर !अजोय मेहता हे देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतले अधिकारी. तेच नंतर उद्धव ठाकरे यांचे डार्लिंग कसे काय होऊ शकतात?अगदी त्यांना सल्लागार नेमण्यापासून ते त्यांची निवृत्तीनंतरची काळजीही ठाकरे यांनी घ्यावी इतके जवळचे?

म्हणजे सरकार बदलले तरी दीर्घकाळ प्रशासनावर फडणवीस यांचाच प्रभाव होता. आजही तो कायम आहे. महाविकास आघाडीचे नेते शहाणे झाले नाहीत, तर पोलीस अधिकाऱ्यांबरोबरच प्रशासनातली ही मंडळी सहाव्या मजल्यावरच्या खुर्चीखाली सुरुंग लावतील.काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष सत्तेतले अनुभवी आहेत. त्यांना प्रशासनाची नाडी नेमकी ठाऊक आहे. अजित पवार, जयंत पाटील, अशोक चव्हाण यांच्यासारखी प्रशासनावर पक्की मांड असलेली मंडळी सत्तेत आहेत. परंतु प्रश्न आहे शिवसेनेचा. उद्धव ठाकरे यांना प्रशासनाचा अनुभव नाही. अनिल परब यांच्यासारखी शाखाप्रमुख मर्यादेची माणसं सोबत आहेत. लॉक डाऊनच्या काळात त्यांनी ज्या बेजबाबदारपणे एसटी सेवा हाताळली त्यावरून त्यांचा आवाका लक्षात येतो. आणि वरूण देसाईच्या पत्रकारपरिषदेला शेजारी बसण्यावरून राजकीय समजही कळते. कारभार करताना निष्ठावंत माणसं आवश्यक असतात, पण ती योग्य क्षमतेचीही असावी लागतात. सुभाष देसाई वगळता शिवसेनेतली अनुभवी माणसं सत्तेबाहेर आहेत आणि एकनाथ शिंदे यांच्यासारखी वकुबची माणसं सत्तेत असूनही किनाऱ्यावर आहेत.

परमवीर सिंग हे आजघडीला भाजपच्या हातातले बाहुले आहेत. त्यांच्या माध्यमातून भाजपनं सरकारच्या एकोप्यावर घाव घातलाय. पूजा चव्हाण मृत्यू प्रकरण किंवा अँटिलिया स्फोटकं प्रकरण या दोन्हींमध्ये शिवसेना अडचणीत होती. सचिन वाझेंचे शिवसेनेशी असलेले संबंध आणि परमवीर सिंग यांनी त्यांना सेवेत परत घेण्यासाठी दाखवलेली सहृदयता यामुळे गृहमंत्रीपद राष्ट्रवादीकडे असले तरी टीकेचा रोख शिवसे-नेवर होता. परमवीर सिंग यांनी शिवसेनेकडचा हा रोख राष्ट्रवादीकडे वळवून शिवसेनेची शाबासकी मिळवलीच आहे, त्याचवेळी उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील आणखी एका मंत्र्याला राजीनाम्याच्या उंबरठ्यावर आणून उभे केले आहे.अनिल देशमुख गृहमंत्रिपद सांभाळायला सक्षम नाहीत हे सिद्ध झाले. तुमचे पोलीस तुमच्याआधी विरोधी नेत्यांना रिपोर्टिंग करीत असतील तर तुमच्या पदाला काय अर्थ आहे? परमवीर सिंग यांचे एवढे सगळे नाटक होईपर्यंत तुम्हाला काही कळत नसेल तर तुमचे गुप्तचर हप्ता वसुलीच्या मोहिमेवर पाठवलेत काय ?

इतके सगळे घडत असताना मुख्यमंत्री कार्यालयाने जी विनोदबुद्धी दाखवली, त्याबद्दल त्यांना हस्यसम्राट किताबच द्यायला हवा. तीन-चार तास जगभर बोंबाबोंब झाल्यानंतर मुख्यमंत्री कार्यालय म्हणते, आम्ही परमवीर सिंग यांच्या इमेलची खात्री करून घेतोय! याला म्हणतात माहितीची शहानिशा करणे आणि वस्तुस्थितीचे नेमके आकलन करून घेणे ! व्वा !!

अनिल देशमुख यांच्यावरील आरोपांमुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला तर उद्या हीच मंडळी आणखी एखाद्या अधिकाऱ्याला उभे करून मुख्यमंत्र्यांवर आरोप करतील त्यावेळी काय करणार ? याचाही विचार व्हायला हवा.

माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्या गेल्या दोन तीन दिवसांच्या निवेदनात सातत्याने रश्मी शुक्ला यांचा उल्लेख होतोय. पोलिस आणि प्रशासनातील ज्या उजव्या मंडळींचा उल्लेख केला जातोय त्यामध्ये प्राधान्याने उल्लेख करावे असे नाव म्हणजे रश्मी शुक्ला. कोरेगाव भीमाची दंगल झाली तेव्हा या शुक्ला मॅडम पुण्याच्या पोलीस आयुक्त होत्या. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली एल्गार परिषद आणि अर्बन नक्षलची पटकथा लिहून घेतली. संभाजी भिडे आणि मिलिंद एकबोटे यांना क्लीनचीट दिली. शुक्ला यांची स्क्रिप्ट पुढे के. वेंकटेशम या त्यांच्याच वैचारिक भावंडाने पुढे नेली आणि आनंद तेलतुंबडे यांच्यासह देशभरातील अनेक विचारवंतांना अटक केली.

महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर शरद पवार यांनी कोरेगाव भीमा दंगलीच्या तपासातील त्रुटींवर बोट ठेवले आणि फेरतपास करण्याचे सूतोवाच केले. गृहमंत्री अनिल देशमुख यांनी त्यासाठी पावले टाकण्यास सुरुवात केली. दरम्यान २६ डिसेंबर २०१९ रोजी सायंकाळी रश्मी शुक्ला यांनी शरद पवार यांची सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली. कोरेगाव भीमा दंगल आणि एल्गार परिषदेचा कसा संबंध आहे, अर्बन नक्षल प्रकरण कसे घातक आहे वगैरे पवारांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. शरद पवार यांनी सगळे माहीत असतानाही सुमारे तासभर त्यांचे ऐकून घेतले होते.

त्यानंतरही महाराष्ट्र सरकारने फेरतपासाच्या दृष्टीने कार्यवाही सुरू ठेवली तेव्हा फडणवीस आणि कंपनी बिथरली. फेरतपासात शुक्ला- वेंकटेशम यांचे कुभांड उघड होईल आणि देवेंद्र फडणवीस यांनी फिरवलेले चक्र उलटे फिरेल या भीतीने फडणवीस यांनी दिल्लीला साद घातली आणि अचानक तपास एनआयए ने ताब्यात घेतला.

दरम्यान कोरेगाव भीमा प्रकरणात मानवाधिकार कार्यकर्त्यांवर पुणे पोलिस आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून करण्यात आलेली कारवाई ही खोट्या पुराव्यांच्या आधारावर झाल्याची धक्कादायक माहिती नव्या फॉरेन्सिक अहवालातून समोर आली आहे. एल्गार परिषदेचा संबंध माओवादाशी जोडून पोलिसांनी रोना विल्सन, गौतम नवलखा, आनंद तेलतुंबडेसह अनेक मानवाधिकार कार्यकर्ते आणि बुद्धीजीवीना ताब्यात घेतलं होतं. या व्यक्तींविरोधात पोलिसांनी सादर केलेले पुरावेच बनवाट होते, असा खुलासा वॉशिंग्टन पोस्ट या वृत्तपत्रानं केला.आर्सेनल कन्सल्टींग या अमेरिकेतील डिजीटल फोरेन्सिक कंपनीकडील कागदपत्रं वॉशिंग्टन पोस्टच्या हाती लागल्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. रोना विल्सनसह एल्गार परिषदेशी संबंधित व्यक्तींच्या लॅपटॉपमधील पत्र आणि डेटा पुरावा म्हणून कोर्टात सादर करण्यात आला होता. याच पुराव्यांच्या आधारावर या मानवाधिकार कार्यकर्त्यांनी माओवाद्यांच्या मदतीनं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप त्यावेळी करण्यात आला होता. देशविघातक कट रचण्याच्या आरोपांखाली गेल्या तीन वर्षांपासून हे कथित आरोपी तुरूंगवास भोगत आहेत. आता या आरोपींच्या लॅपटॉप आणि मोबाईलमधून पोलिसांनी हस्तगत केलेले आणि कोर्टात सादर करण्यात आलेले हे पुरावेच बनावट असून अनोळखी हॅकर्सनी ही कागदपत्रं संबंधीत आरोपींच्या लॅपटॉपमध्ये घुसवली असल्याचं सिद्ध झालंय. त्यामुळे भीमा कोरेगाव प्रकरणात सरकारकडून करण्यात आलेल्या या कारवायाच बनवाबनवीच्या खोट्या कागदपत्रांच्या आधारावर करण्यात आल्याचा दावा पोस्टनं केला. आर्सेनलच्या या फॉरेन्सिक अहवालाची पडताळणी वॉशिंग्टन पोस्टच्या संगणक तज्ञांनी केली असून रोना विल्सनसह अनेकांची करण्यात आलेली ही अटक खोट्या पुराव्यांच्या आधारावर होती,सुशांत सिंग प्रकरणातही अशाच रीतीने सीबीआय घुसली, एनसीबी घुसली. त्याच पद्धतीने अँटिलिया स्फोटके प्रकरणात एनआयए घुसली.रश्मी शुक्ला कनेक्शन नेमके काय आहे हे कळण्यासाठी हा प्रपंच. आता या शुक्ला मॅडमनी दिलेला अहवाल कितपत विश्वासार्ह असेल आणि वस्तुनिष्ठ असेल, त्यावर सरकारने विश्वास ठेवण्याजोगी परिस्थिती होती का हे संबंधितच सांगू शकतील.

## सचिन वाझेला गजाआड घालणारे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस भिडेला क्लीनचीट देतात तेंव्हा

भिमा-कोरेगाव हल्ल्यानंतर, भाजपसारखी आक्रमक भूमिका त्यावेळी कॉंग्रेस-राष्ट्रवादी या विरोधी पक्षांनी घेतली असती तर भिडेला अटक झाली असती व फडणवीसांचं तोंडही काळं झालं असतं...पण हजारो आंबेडकरवादी अनुयायांचं, महिलांचं आणि बालकांचं रक्तपात होऊनही त्यावेळेच्या विरोधी पक्षाला आक्रमकपणे सत्तारूढ भाजप विरोधात रणकंदान करता आलं नाही. आक्रमक भूमिका घेऊन भिडेला अटक करण्याची मागणी करता आली नव्हती. खरं तर कॉंग्रेस-राष्ट्रवादीने मूळमुळीत मागणी करण्यापलिकडे फार काही केलेलं नाही, किंबहुना जातीयवाद व धर्मांध पेशवेशाहीला संरक्षण देण्याचा प्रयत्नच विरोधी पक्षांनी केला असाच संशय आता येतोय. सचिन वाझेच्या प्रकरणाने कॉंग्रेस- राष्ट्रवादीचे डोळे उघडण्यास हरकत नसावी. शिव-सेना ज्यांचे प्रमुख आज मुख्यमत्रीपदी बसलेत त्यांनीही भिमा-कोरेगाव प्रकरणात मूग गिळून बसण्या पलिकडे फार काही केलं नव्हतं. किंबहुना भिडे बाबत बोटचेपे भूमिका त्यांनी घेतली. आज या तिन्ही पक्षांवर भाजपने वाझे प्रकरणात बूमरॅंग केलाय. महाविकास आघाडीची, बिघाडी करून टाकलीय. भिमा-कोरेगाव प्रकरणात सामाजिक न्यायाची भूमिका कॉंग्रेस-राष्ट्रवादीने घेतली असती तर तत्कालीन भाजपला पळताभूई थोडी झाली असती. आंबेडकरवादयांनी केलेल्या महाराष्ट्र बंद मध्ये सहभागी झाले असते तर महाराष्ट्राचा लॉकडाऊन तेंव्हाच झाला असता.मनसुख हिरेनची हत्या दूर्दैवीच आहे त्याच्या आरोपींना कठोर शिक्षा व्हायलाच हवी.पण एका व्यक्तीच्या मृत्यूने राष्ट्रपती राजवटीची मागणी होतेय कोणताही जनक्षोभ नसताना. कोणताही जनतेतला असंतोष नसताना व कुणीही रस्त्यावर उतरलेलं नसताना केवळ मिडीयाच्या आधारे भाजप असं चित्रं निर्माण करण्यात यशस्वी झालाय. उलट पक्षी २०१८ च्या भिमा-कोरेगाव हल्ल्या प्रकरणात एक व्यक्ती नव्हे तर हजारो लोक गंभीर जखमी झाले होते. महिला, वृद्धांसह छोटया बालकांचं रक्त वाहिलं होतं. एका तरूणाचा मृत्यू झाला होता. महाराष्ट्र बंद नंतर तर भाजप सरकारने हजारो आंदोलकांना जायबंदी केलेले. खोटया केसेस टाकून तरूणांना आयुष्यातून उठविले होते.भाजप सरकारच्या अमानूष हिंसाचारा विरोधात त्यावेळेच्या विरोधी पक्षांनी कणखर भूमिका घेतली असती तर आजचा आक्रमक विरोधी पक्ष "भाजप " लूळापांगळा झालेला दिसला असता. महाविकास आघाडीच्या विरोधात उभं राहाण्याची हिंमत, भिमा-कोरेगाव प्रकरणातील पापी देवेंद्र फडणवीसांना झा-लीच नसती. मयत हिरेनचे व वाझेंच्या संभाषणाचे उव्हे ज्या तडफेने फडणवीसांनी काढले त्याच तडफेने भिडे-एकबोटाच्या संभाषणांचे उव्हे तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीसांनी काढले असते तर भिडे-एकबोटेंसह मोठमोठी धेंडं हाताला ला-गली असती.पण सचिन वाझेंना गजाआड घालणारे विरोधी पक्ष नेते फडणवीस दंगलखोर भिडेला क्लीनचीट देतात तेव्हा त्यांच्याउच्छअतील सनातनी ब्राम्हण्यवाद उघड होतो. किमान भिडे-एकबोटेचा उव्हे काढण्याची भूमिका कॉंग्रेस-राष्ट्रवादी या विरोधी पक्षांनी बजावणं अपेक्षित होतं. मात्र या धर्मनिरपेक्ष-लोकशाहीवादी पक्षांना यातलं गांभिर्य लक्षात आलं नसावं किंवा त्यांनी याकडे दुर्लक्ष केलेलं असावं. भिमा-कोरेगाव प्रकरणी महाराष्ट्रातील पोलिस यंत्रणा योग्य कामगिरी करित होती असा विश्वास असणाऱ्या फडणवीसांनी जर NIA ला हे प्रकरण देण्याची मागणी केली असती तर मुख्यमंत्री म्हणून त्यांची लायकी सिद्ध झाली असती. भिमा-कोरेगाव संबंधित एल्गार प्रकरणात छ्खअ तपास करतंय. पण भिमा-कोरेगाव हल्ल्या प्रकरणी NIA तपास करू शकत नाही. केवढा हा विरोधाभास! आंबेडकरवादयांच्या बाबतीत भिडे-एकबोटे हे धर्मांध आतंकवादी असले तरी त्यांचा छ्खअ कडून तपास झालाच पाहिजे अशी मागणी सनातनी ,जात्यांध- धर्मांध विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस करतीलच अशी शक्यता नाही. सार्वभौमत्व असणाऱ्या भारत देशातील सरकारी यंत्रणा आपल्या मर्जीप्रमाणे वापरुन देशात एकाधिकारशाही व हुकूमशाही प्रस्थापित करण्याचं षडयंत्र चालू आहे. समन्यायी भूमिका न घेता,विशिष्ट वर्गाच्या हिताकरिता सर्व सरकारी यंत्रणा त्यांना वाटतील तिथे वापरायच्या असा अन्यायी कारभार देशात सुरू आहे.

शहीद-दाभोळकर-पानसरे यांचे मारेकरी भाजप सरकार असताना का पकडले गेले नाहीत. अलिकडे न्यायालयाने या प्रकरणात पोलिसांना खडसावले असतानाही देवेंद्र फडणवीसांना या प्रकरणात सभागृहात भूमिका मांडवीशी वाटली नाही. तिकडे कर्नाटकात भाजपचं सरकार आलंय, शहीद कलबूर्गी-गौरी लंकेश प्रकरणाचं नेमकं काय झालं याचाही फडणवीसांनी विचार करावा.त्यांचे मारेकरी पकडले जात नाहीत म्हणून फडणवीस, गृहमंत्री अमित शहांना सांगून महाराष्ट्र व कर्नाटकात NIA ची चौकशी करायला लावतील का?

हिरेनच्या मारेकऱ्यांना व अंबानींच्या घराजवळ ठेवलेल्या जिलेटीन कारचा योग्य तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा व्हायलाच हवी यात दुमत नाहीच. बरं तिथे फक्त अंबानीच राहत नाहीत इतरही लोक राहतात त्यांच्या जीवाला किंमत नाही का? तिथल्या रहिवाशांचेही उल्लेख विरोधी पक्ष नेतेही करत नाहीत व मिडीयातंही कुठे उल्लेख होत नाही. श्रीमंतांच्या लाचारी पुढचा हा राजकीय नेत्यांचा हा कळसच! वास्तविक भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाच्या जीव-ाला समान किंमत दिलीय. याचं भान सत्तेचा लॉलीपाप दिसणाऱ्या विरोधी पक्षाला कुठे राहिलंय!

मुकेश अंबानीचा जीव जितका महत्त्वाचा आहे तितकाच तिथे राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा जीव महत्त्वाचा आहे. अंबानी प्रकरणात कठोर कारवाई जितकी महत्त्वाची आहे तितकीच महत्त्वाची कारवाई भिमा-कोरेगाव प्रकरणात व भिडेवर आवश्यक आहे.हिरेन हत्येचे मारेकरी पकडणं जितके महत्त्वाचे तितकंच शहीद दाभोळकर-पानसरे, कलबूर्गी- गौरी लंकेशचे मारेकरी पकडणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे जनतेने ढोंगी, लबाड विरोधी पक्ष नेत्यांच्या भूमिकेवर विश्वास ठेवू नये.भिमा कोरेगाव व शहीद दाभोळकर-पानसरे, कलबूर्गी,गौरी लंकेश प्रकरणी पूतन मावशीची भूमिका घेणाऱ्या विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस व प्रविण दरेकरांना याचा जबाब जनतेने विचारावा! दुसरी कडे महाविकास आघाडीचं सरकार समन्यायी भूमिकेतून काम करेल व आता तरी जागं होईल अशी आशा आहे. सर्व समाज घटकांना योग्य न्याय देण्यास महाविकास आघाडीने लबाडी केलीच तर भविष्यात भाजप सत्तारूढ तर होईलच पण महाविकास आघाडीचे सर्व लोक गजाआड टाकले जातील. २०१९ पूर्वीचा काळ आठवला तर महाविकास आघाडीच्या सर्व लक्षात येईल. आता ईडी, CBI, NIA चा वापर तुमचाचा डॅमेज कंट्रोल करण्याकरिता होईल. मला वाटतं, महाविकास आघाडी जागी होऊन, बहुजनांना सोबत घेईल अशी अपेक्षा आहे

**विशाल हिवाळे**
**(अध्यक्ष-संविधानवादी रिपब्लिकन पक्ष)**
**संपर्क -९०२२४८८११३**

## धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?

धर्मनिरपेक्षता ही संकल्पना मुळात विविधांगी असल्याचे प्रथमदर्शनी जाणवते, पण ही विविधांगी नसून मुळात पाहणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे . धर्मनिरपेक्षता हा शब्द प्रयोग आपल्या राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत घटनेच्या २५ व्या कलमानुसार स्पष्ट केला आहे .१९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्ती नुरूप आपल्या उद्देश पत्रिकेत समावेश करण्यात आलेला आहे .

१) भारतातील कोणत्याही व्यक्तीला त्याला योग्य वाटणाऱ्या उपासनेचा, धर्म पालनाचा ,पारलौकिक कल्याणाचा ,अध्यात्मिक उन्नतीचा पूर्ण अधिकार आहे.

२) वरील अधिकारात धर्माच्या नावावर सरकार हस्तक्षेप करणार नाही .

३)सामाजिक व राजकीय जीवनात व्यक्ती व्यक्ती मध्ये धर्माच्या नावाने भेदभाव केला जाणार नाही.

मग धर्मनिरपेक्षते बद्दल वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनात उपस्थित होणारे प्रश्न सोडविताना त्यांच्याकडे धम'निरपेक्ष दृष्टीने म्हणजे मानवाच्या अहीक कल्याणाच्या दृष्किोनातून पहावे, मग हे प्रश्न नीती, शिक्षण, अर्थव्यवस्था, राजकीय व सामाजिक संस्था इत्यादी जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील असोत याच भूमिकेस धर्मनिरपेक्षता म्हणतात. मात्र धर्मनिरपेक्षता म्हणजे अपवित्र,धम'बद्दल असहिष्णू असे नाही. "धर्मनिरपेक्ष म्हणजे एवढेच की जिवणाची व्यवस्था लावताना ,धर्म कल्पना प्रस्तुत करताना ,त्यापासून कुणालाही त्रास होणार नाही" या गोष्टीचे भान ठेवावे लागेल

धर्मनिरपेक्षतेचा अविष्कार खालील तीन पातळीवरहोऊ शकतो

१) इतरांसी अजिबात संबंध येत नाही ,असे ,निवड वैयक्तिक जीवनाचे क्षेत्र . यात स्वत:पुरते पाळावयाचे धर्म नियम वगैरे .

२) दुसरे असे की ,व्यक्ती आणि व्यक्ती किंवा व्यक्ती आणि समाज यांच्यामधील संबंध .हे दुसऱ्या पातळीवरचे आहेत . धर्मविषयक स्वत:ची काहीही भूमिका असली तरी तिच्यातून निष्पन्न होणारे विधिनिषेध दुसऱ्यावर न लादणे , उलट त्यांच्या भावनांची आणि आवडीनिवडी ची मोकळ्या मनाने कदर करणे, हे धर्मनिरपेक्षतेचे सामाजिक अंग होईल .

उदा. स्वतः शाकाहारी असून घरी आलेल्या पाहुण्यास सामिस भोजनाची सवय किंवा आवड असली तर त्याला तसे भोजन देणे .

किंवा इतरांशी सबंध जोडताना जात ,धर्म, पंथ इत्यादी गोष्टींचा विचार न करता केवळ अहिक निकष लावणे हे होईल.

३) नागरिकांचे हक्क व त्यांची कर्तव्य कर आकारणी इत्यादी बाबतीत धर्माच्या नावाने भेदभाव नसणे व कोणतेही धोरण ठरवताना धर्माचा विचार संपूर्णतः अप्रस्तुत मानणे हे होय . प्रत्यक्षात अनेकदा असे दिसते की ,वैयक्तिक पातळीवर धर्मनिरपेक्ष नसलेली माणसेही इतरांशी वागताना धर्मनिरपेक्ष असू शकतात .एखादा समाज धर्मनिरपेक्ष नसला तरी, शासन धर्मनिरपेक्ष असू शकतो .विज्ञानपूर्व युगात जवळ जवळ सर्वच संस्कृतीत धर्माचे अधिष्ठान होते . म्हणून त्यांनी निर्माण केलेली साहित्य ,कला ,सामाजिक संस्था इत्यादी प्रेरणा धर्म मूलक होती .

परंतु कालपरत्वे संस्कृतीची वेगवेगळी अंगे स्वायत्त होऊ ला-गली व पुढे पुढे ती अहिक असहिष्णू विकसनशील समाजाच्या अंगी रुढ झाली .

धर्मनिरपेक्षतेचा उल्लेख बायबलमध्ये सापडतो तो असा की (मॅथु २२ ;२१)येथे येशू ख्रिस्त असे स्पष्टपणे



सांगतो की , "सीझरचे देणे सीझरला द्या आणि देवाचे देवाला "याच पार्श्वभूमीवर भारतीय संस्कृतीचे रक्षक प्रगाट धर्मपंडित स्वामी विवेकानंद यांनी शिकागोच्या १८९३ च्या आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेत हिंदू धर्माबद्दल आणि इतर धर्माबद्दल धर्मनिरपेक्षतेचे बद्दल खालील प्रमाणे उद्घोष केले आहे .

" The Christian has not to become Hindu or Buddhist nor a Hindu or Buddhist to become Christian . But each must assimilate the spirit of the other and yet preserve his individuality and grow according to his own law of growth . Every religion has produced men and women of most exalted character. If in the face of this evidence anybody dreams of the the exclu-sive survival of his own religion and destruction of the others . I pity him from the bottom of my heart .

धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?

१) भारतीय राज्यघटनेनुसार धर्मनिरपेक्ष या संकल्पनेचा सैद्धांतिक अभ्यास करणे .

२) आजच्या काळानुसार धर्मनिर-पेक्षतेची उपयुक्तता अभ्यासणे .

३)धर्मनिरपेक्षतेपुढील आव्हानांचा अभ्यास करणे .

४) धर्मनिरपेक्षता बळकट करण्याकरिता उपाययोजना करणे .

निष्कर्ष:

धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्म विरोध नाही किंवा धर्माचे अस्तित्व संपविण्याचा संकल्पही नाही. तर सार्वजनिक जी-वनात धर्माबद्दल कोणती भूमिका घ्यावयाची याबद्दलची ती तात्विक चौकशी आहे . आज भारतीय समाजात धर्माच्या आधारावर अनेक शक्ती आपले वर्चस्व निर्माण करताना दिसत आहेत . त्यामुळे प्रस्तुत लेखात आपण धम'निरपेक्षता म्हणजे काय ? तिची आजच्या काळानुरूप उपयुक्तता , वैविध्यपूर्ण सामाजिक रचना व संस्कृती असणाऱ्या भारतासारख्या लोकशाही देशात तप-ासून पाहणे गरजेचे आहे . एकाबाजूला अभिव्यक्तिस्वातंर्त्य पाहिजे तर दुसऱ्या बाजूला ज्या धर्मांधतेमुळे असहिष्णूता व हिंसा निर्माण होते अशा कोणत्याही गोष्टीला न्यायालयीन संरक्षण असू नये . तसे झाल्यास संतुलित वास्तववादी , बुद्धिवादी , अहिंसक , शांततावादी विचारधारेचा हकनाक बळी जातो . हे बंड थांबवण्यासाठी भारतीय घटनेच्या आधारावर प्रभावीपणे धर्मनिरपेक्ष मूल्यांचा विकास कार्यकारी मंडळाकडून झाला पाहिजे . वरील विचार हे वैयक्तिक लेखन कर्त्याचे आहेत आपण सहमत / असहमत विचार विवेक आपापला तुर्तास इथेच अल्पविराम .

**एड.योगेश पारधी**
**गोंदिया**

## कोटपा कायदा २००३ अंतर्गत तंबाखू विक्रेत्यांवर धडक कारवाई

**गोंदिया :** जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवनाच्या दुष्परिणामाला लक्षात घेवून नुकतेच डुग्गीपार पोलीस स्टेशन अंतर्गत येणा?्या गावांमधील तंबाखू विक्रेत्यांवर कोटपा कायदा २००३ अंतर्गत आरोग्य विभाग व पोलीस विभागाच्या सहयोगाने कारवाई करण्यात आली.

कोटपा कायदा २००३ अंतर्गत कलम ४ नुसार सार्वजनिक क्षेत्रात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवनावर बंदी, कलम ५ नुसार तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिरातीवर बंदी, कलम ६ (अ) नुसार अल्पवयीन व्यक्तीस तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणे हा दंडनीय गुन्हा व कलम ६ (ब) नुसार शैक्षणिक संस्थांच्या परिसराततंबाखूजन्य पदार्थ विक्री करण्यास बंदी तसेच कलम ७ नुसार तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या वेस्टनवर धोक्याची सूचना देणे बंधनकारक आहे. सार्वजनिक ठिकाणी जसे- रेल्वे स्टेशन, दवाखाना, शाळा, महाविद्यालये, बसस्थानक, शासकीय/अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी तसेच शाळा व दवाखाना यांच्या १०० मीटर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ (खर्रा/गुटखा/पान मसाला) विक्री करतांना आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

सदर धाड सत्रात कलम ४, कलम ५ व कलम ६ (अ) अंतर्गत २० पानटप?्यांवर धाड मारण्यात आली व ७ लोकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. सदर कारवाई जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ.अनिल आटे, मनोवैज्ञानिक सुरेखा मेश्राम, सामाजिक कार्यकर्त्या संध्या शंभरकर, तार्केश उके, विवेकानंद कोरे तसेच पोलीस निरीक्षक डुग्गीपार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस घनश्याम उइके, नेमराज कुरसुंगे यांनी केली.

## हा प्रश्न मराठी साहित्याला कधी पडेल ?

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड केली त्याबद्दल आयोजकांचे मना-पासून आभार मानते. या पदासाठी माझा अधिकार काय.. माझी खरंच योग्यता आहे का.. याविषयी माझ्या मनात अनेक संभ्रम आणि शंका होत्या आणि आहेत. आद-रणीय सरोजकाकू काशीकरांशी मी त्याबद्दल मोकळेपणाने बोलले होते परंतु त्यांच्या आग्रहाखातरच शेवटी ही जबाबदारी स्वीकारण्यासाठी मी होकार दिला. महान व्यक्तींच्या केवळ सहवासानेही तुमचं आयुष्य कसं उजळून निघू शकतं याचं प्रत्यंतर परत एकदा येतंय. आद-रणीय शरद जोशींचा जो काही सहवास फार थोडया काळासाठी लाभला त्याचीच परिणती म्हणजे आजची ही जबाबदारी आहे. त्यामुळे हे पद स्वीकारताना माझ्या मनात ङ्गमी तव हमाल भारवाहीफ ही पूर्ण जाणीव आहे. मी विनम्र आहे.

यवतमाळ जिल्ह्यातल्या राळेगाव तालुक्यातील रावेरी या गावाची सातव्या अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनासाठी निवड करण्यात आली याचे एक वेगळे महत्व आहे. केवळ भारतातलेच नाही तर संपूर्ण जगा-तले एकमेव असे सीतेचे मंदीर या रावेरी गावात आहे. रामाने सीतेचा त्याग केल्यावर लक्ष्मणाने गर्भार अवस्थेत सीतेला रावेरी या गावी आणून सोडले. लव-कुश यांचा जन्म इथेच झाला. तसेच लव-कुशांनी अश्वमेध घोडा इथेच अडवला अशी आख्यायिका आहे. भारतात ठिकठिकाणी रामाची मंदिरे आढळतात. पण सीतेचं मंदीर दिसत नाही. रामाच्या सोबतीने सीता, लक्ष्मण आणि हनुमानही येतात पण केवळ सीतेचे मंदीर मात्र रावेरी इथेच आढळते. साहित्यामध्येही इंग्रजीमध्ये अमिश यांनी सीतेवर लिहिले आहे. कर्णावर विपुल लिहिल्या गेलं पण वृषालीचा विचार कोणी केलेला दिसत नाही. मध्यंतरी कविता काणे यांनी वृषालीवर लिहिले आहे. थोडक्यात स्त्रियांची उपेक्षा इथेही संपत नाहीच.

शेतकरी संघटनेचे संस्थापक-नेते माननीय शरद जोशी यांनी २०१० साली या मंदिराचा जीर्णोद्धार केला. स्त्रिया आणि लहान मुलं यांच्याबद्दल शरद जोशींना अपार कणव होती. स्त्रिया आणि लहान मुलं यांचं दु:ख मला बघवत नाही. मला ते भाषेत मांडता येत नाही म्हणून मग मी संख्याशास्त्राचा आधार घेतो असं शरद जोशी म्हणायचे.

सीता ही परित्यक्ता स्त्रियांचं प्रतीक. म्हणून रावेरी या गावी परित्यक्ता स्त्रियांसाठी एक आधारगृह चालवावं अशीही त्यांची इच्छा होती. भारतात स्त्रिया, दलित आणि शेतकरी यांची स्थिती थोड्याफार फरकानं सारखीच आहे. तिघांच्याही वाटयाला कायमच उपेक्षा, शोषण आणि अन्याय आलेला आहे. त्या अर्थानं रावेरी या ठिकाणाची संमेलनासाठी निवड होणं हे प्रतिकात्मक आणि महत्वाचं आहे.

मराठी साहित्याचा अभ्यास केला तर असे दिसते की, मराठी साहित्यानं नगण्य म्हणता येईल अशी शेतकऱ्यांच्या दु:खाची व समस्यांची दखल घेतली आहे. काही अपवाद सोडले तर सर्वसामान्यपणे लेखकांचे, कवींचे लिखाणाचे विषय हे मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, शहरी जीवनाचं चित्रीकरण करणारे दिसतात. ग्रामीण भागाचं चित्रीकरण आलं असलं तरी त्यात शेतकरी फारसा दिसत नाही.

ज्या काही थोड्या लेखकांनी त्यांच्या लिखाणातून शेतकरी जीवन व समस्यांचं चित्रण केलं आहे त्यांचा आढावा इथे घेणं मला गरजेचं वाटतं.



रवींद्र शोभणे यांची "कोंडी' कादंबरीतून शेतमजुरांचं जीवन, त्यातली हतबलता, ग्रामीण संरजाम वृत्ती, स्वार्थांधता याचं वर्णन आलं आहे. शेषराव मोहिते यांची "असं जगणं तोलाचं' ही कादंबरी शेती करणे म्हणजे भीषण गाळात रुतणे हे भीषण वास्तव मांडते. शेषराव मोहिते यांच्याच "धुळपेरणी'मधील नायक म्हणतो, शेतीतल्या हिरवेपणाच्या भरवश्यावर सारे आयुष्य आलटून-पालटून गहाण ठेवावे आणि हे सर्व माहित असूनही आम्ही शेती करावी अशी तुमची अपेक्षा? तुम्ही आम्हाला काय येडझवे समजता की काय? याशिवाय तानाजी पाटील, प्रकाश देशपांडे, कैलास दौंड, कृष्णात खोत, प्रा. महेंद्र कदम यांच्या कादंबऱ्यांमध्येही शेतीचा प्रश्न केंद्रस्थानी आढळतो.

इंद्रजीत भालेराव यांच्या कविता, सदानंद देशमुख यांची ङ्गबारोमासफ यांचा उल्लेख करावाच लागेल. ही काही मोजकी उदाहरणं सोडलीत तर समाजातल्या इतक्या मोठ्या वर्गाविषयी साहित्याला काही घेणंदेणं दिसत नाही.

समाजाला काही विचार-मूल्य देणे, रंजन करणे आणि सामाजिक बांधिलकी हे साहित्याचे उद्देश मानले तर मराठी साहित्य त्या कसोटीवर कुठे उभे आहे याचा विचार करायला हवा. त्यातुलनेने हिंदी साहित्याचा विचार केला तर प्रेमचंदाच्या लिखाणात शेतकरी आणि सर्वहारा वर्गाच्या समस्यांचं आणि दु:खाचं चित्रण आढळतं. प्रेमाश्रम, कर्मभूमी व गोदान या तीन कादंबऱ्या त्याचं उत्तम उदाहरण आहे. शेतकरी जीवनाचा कोणताही पैलू या कादंबऱ्यांमध्ये अस्पर्श राहिलेला नाही. "प्रेमचंद और उनका युग' मध्ये रामविलास शर्मा लिहितात, "उन्होंने उस धडकन को सुना जो करोंडो किसानों के दिल में हो रही थी. उन्होंने उस अछूते यथार्थ को अपना कथा विषय बनाया. जिसे भरपूर निगाह देखने का हियाव ही बडों-बडों को न हुआ था.''

हिंदीतले वरिष्ठ साहित्यिक संजीव यांनी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर "फाँस' नावाची कादंबरी लिहिली आहे. मात्र २००० सालापासून इतक्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या होत आहेत, त्यावर एकही मराठी कादंबरी लिहिल्या गेल्याचे माझ्या तरी ऐकिवात वा वाचनात नाही.

मराठी साहित्यिकांना हा विषय महत्वाचा वाटत नाही असा निष्कर्ष यातून काढावा का? हजारोंनी शेतकरी आत्महत्या करतात, त्यांची मुलं अनाथ होतात, उद्ध्वस्त होत चाललेली ग्रामीण अर्थ व शेतीव्यवस्था, तोटयातली शेती यावर साहित्यिकांची लेखणी का चालत नाही?. ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांनी म्हटलं होतं की, "शेती आणि त्याच्याशी संबधित अर्थकारण, विषय यांचा अभ्यास साहित्यिकांनी करायला हवा व त्यावर लिहायला हवे'.

मुन्शी प्रेमचंद यांनी अखिल भारतीय प्रगतीशील लेखक संघांच्या अध्यक्षस्थानावरून भाषण करताना म्हटलं होतं की, "शेतावर काम करुन घामाघूम झालेल्या स्त्रीला, आपल्या मुलाला बांधावर झोपवताना बघणं हा ही सौंदर्य अनुभव आहे. तुमच्या सौंदर्य दृष्टीचा विस्तार केला तर तुम्हाला केवळ सुंदर स्त्रीमध्ये सौंदर्याचा अनुभव येणार नाही. तर तुम्ही कष्टकरी महिलेच्या सुकलेल्या ओठांमध्ये आणि तिच्या गालावरच्या सुकलेल्या अश्रूंमध्ये त्याग, सहिष्णुता आणि कष्टाचे सौंदर्य बघू शकाल''

**सौंदर्यदृष्टीचा विस्तार करण्याचा हा विचार अतिशय मौलिक आहे.**

इंग्रजीतील ज्येष्ठ नोबेल पुरस्कार विजेते भारतीय वंशाचे साहित्यिक व्ही.एस. नायपॉल हे भारतात आले होते तर नामदेव ढसाळ यांच्यासोबत मुंबईच्या रेडलाईट भागात रिक्षाने फिरले होते. नायपॉल यांची जीवन समजून घेण्याची ही तृष्णा मला विलक्षण वाटते: ही तृष्णा आमच्या साहित्यिकांमध्ये का दिसत नाही? शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय काय आहे तो समजून घ्यावा, त्यासाठी त्या जिल्ह्यांना भेट दयावी, आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट दयावी आणि त्यावर काही लिहावे असा विचार कोणाच्याही मनात का येऊ नये? हे दु:खद आहे. शरद जोशींनी म्हटल्याप्रमाणे, एका दाण्याचे हजार दाणे करणारा शेतकरी दरिद्री आणि एका किलोचं सव्वा किलोही लोखंड करून शकणारा कारखानदार मात्र श्रीमंत हे काय गणित आहे हा प्रश्न साहित्यिकांना पडू नये?.

कवी धूमिल यांची एक कविता उद्धृत करण्याचा मोह मला आवरत नाहीये.

इतनी हरियाली के बावजूद
अर्जुन को नहीं मालूम
उसके गालों की हड्डी क्यों
उभर आई हैं उसके बाल
सफेद क्यों हो गए हैं
लोहे की छोटी-सी दुकान में,
बैठा हुआ आदमी, सोना
और इतने बडे.खेत में खडा आदमी
मिट्टी क्यों हो गया है?

हा प्रश्न मराठी साहित्याला कधी पडेल?

म्हणूनच अखिल भारतीय शेतकरी संमेलनाच्या आयोजकांचा पिढ्यांनपिढ्यांच्या अबोलतेला बोलते करण्याचा हा प्रयत्न अत्यंत महत्वाचा आहे. या निमित्ताने का होईना पण जगाच्या पोशिंद्याच्या जीवनाबद्दल, हतबलतेबद्दल, वर्षानुवर्षांच्या दारिद्यीबद्दल, सरकारच्या धोरणाबद्दल चर्चा घडेल... आणि काहीतरी बदल घडवणारे निर्माण होईल अशी आशा करूयात... ग्रंथसत्तेवर आणि लेखणीच्या ताकदीवर माझा अफाट विश्वास आहे. कार्ल मार्क्सच्या "दास कॅपिटलफ्नेच जगातल्या मोठ्या क्रांत्या घडवून आणल्या होत्या... मराठी साहित्यालाही असे परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय मिळावे अशी प्रामाणिक इच्छा व्यक्त करते आणि माझे भाषण संपवते.

**धन्यवाद!**
**वसुंधरा काशीकर**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयावर ५५ लाखाची विद्युत थकबाकी




**गोंदिया:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय निर्मितीपासूनच चर्चेत राहिला आहे. आरोग्य सेवा असो की इतर कारण महाविद्यालय प्रशासन आपल्या कारभाराने चर्चेच्या केंद्रस्थानी राहत आले आहे. त्यात आता आणखी भर पडली असून महाविद्यालय प्रशासनाने ५५ लाख रूपयाची विद्युत थकबाकी असल्याचे समोर आले आहे. यामुळे महावितरणने विज भरणा करण्यासाठी नोटीस बजावली आहे. थकीत रकमेचा भरणा करण्यात आला नाही तर विज पुरवठा खंडीत होणार, अशीही शक्यता वर्तविली जात आहे.

जिल्ह्यातील जनप्रतिनिधींच्या पुढाकाराने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे राहिले आहे. अशात नागरिकांना उत्तम व दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार, अशी अपेक्षा होती. परंतु, आरोग्य सेवा सोडा विविध कारणांने मेडीकल कॉलेज चर्चेत राहिला आहे. आता त्यात भर पडली असून विद्युत व्यवस्थेला घेवून मेडीकल कॉलेज प्रशासनाच्या अडचणी वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध क्षेत्रात १५ ते १६ विद्युत कनेक्शन घेतले आहेत. परंतु, मागील सहा ते सात महिन्यांपासून विज देयकाचा भरणा मेडीकल प्रशासनाकडून करण्यात आलेला नाही.

त्यामुळे महावितरणचे ५५ लाखाचा विज बिल थकबाकी मेडीकल कॉलेजवर आहे. अशात महावितरणकडून थकीत विज बिलाची वसुली केली जात आहे. या अनुसंगाने मेडीकल कॉलेजवर असलेल्या विज थकबाकीची वसुली होणे बाकी आहे. या संदर्भात महावितरणकडून मेडीकल प्रशासनाला नोटीस बजाविण्यात आली आहे. त्यामुळे विज बिलाचा भरणा करणे गरजेचे आहे. अन्यथा महावितरणच्या कारवाईला मेडीकल प्रशासन समोर जाण्याची दाट शक्यता आहे. कारवाई पोटी मेडीकल कॉलेजचा विद्युत पुरवठाही खंडीत केला जावू शकतो, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

दोन दिवसांपूर्वी महावितरण कर्मचारी मेडीकल कॉलेजच्या वसतीगृहात विज पुरवठा खंडीत करण्यासाठी पोहोचले होते. यावर मेडीकलचे अधिष्ठाता यांनी ७ लाख रूपयाचे विज बिल भरणा केल्यामुळे कारवाई टळली. त्यातच शासनाकडून अद्यापही मेडीकल कॉलेजचा ग्रांट मिळालेला नाही. त्यामुळे विज बिलाचा भरणा करण्यात आला नसल्याचे त्यांनी यावेळी व्यक्त केले. एकीकडे कोरोनाच्या पार्श्वभुमीवर आरोग्य सेवेला प्राथमिकता दिली जात आहे. परंतु, सहा महिन्यांपासून विद्युत बिल भरणा करण्यात आला नसल्याने मेडीकल कॉलेजच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत.

# गृहमंत्री देशमुख यांच्या राजीनाम्यासाठी भाजपचे आंदोलन



**गोंदिया :** मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांनी शनिवारी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. राज्य शासनाच्या या भ्रष्ट कारभाराविरोधात गोंदिया भाजपाच्या वतीने माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली आज २१ मार्च रोजी गांधी प्रतिमा चौकात निदर्शने करत आंदोलन केले व गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

मुंबईचे माजी आयुक्त परमबीर सिंह यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे माहिती दिली की गृहमंत्री अनील देशमुख हे पोलीस अधिकारी यांच्या कडून दर महिन्याला १०० कोटी रुपये बिअर बार व विविध आस्थापनाकडून खंडणी स्वरूपात जमा करून द्यावे अशी मागणी करतात. आता रक्षकच भक्षक झाल्याने त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी भाजपच्या वतीने करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयातून निघून गांधी प्रतिमा चौकात निदर्शने केली.

यावेळी प्रामुख्याने जिल्हा महामंत्री संजय कुलकर्णी, शहर अध्यक्ष सुनील केलनका, ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनलाल ठाकरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भावना कदम, राजकुमार कुथे, संजय मुरकुटे, क्रांती जयस्वाल, धर्मेंद्र डोहरे, अशोक जयसिंघानी, मुकेश चन्ने, मनोज पटनायक, चंद्रभान तरोने, पलाश लालवानी, शंभू ठाकूर, व्यंकट पाथरू, मिलिंद बागडे, संदीप श्रीवास, प्रतीक तिवारी, बंटी शर्मा आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# राकाँपा जिल्हाध्यक्ष विजय शिवणकरांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्यालयात सत्कार



**गोंदिया:-** येथील राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या कार्यालयात आज १९ मार्चला राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनियुक्त राकाँपा जिल्हाध्यक्ष विजय शिवणकर यांचा नियुक्ती पत्र देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन म्हणाले की, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष यांच्यात संघटन कौशल्य असुन त्यांच्या संघटनात्मक दिर्घ अनुभवाचा भविष्यात राष्ट्रवादी कॉग्रेस पाटीला फायदा मिळेल. जिल्हातील पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेवुन संघटनात्मक बांधणी करीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला मजबुती प्रदान करण्यात ग्राम व वार्ड स्तरावरील बुथ कमिट्यांचा मोलाचा वाटा राहील असे विचार सत्काराला उत्तर देतांना श्री शिवणकर यांनी व्यक्त केले.

यावेळी सर्वश्री विनोद हरिणखेडे, शिवकुमार शर्मा, अशोक सहारे, राजु एन जैन, केतन तुरकर, केवल बघेले, जिब्राइल पठाण, मदन चिखलोंढे, रफिक खान, रमेश गौतम, अखिलेश सेठ, तिर्थराज हरिणखेडे, जितेश टेंभरे, आशा पाटील, सुशीला भालेराव, कुंदा दोनोडे, लता रहांगडाले, रूपकुमारी श्रीवास्तव, रामु चुटे, रवि पटले, मोहनलाल पटले, प्रदिप रोकडे, शैलेश वासनिक, सुनील पटले, डा श्रीप्रकाश रहांगडाले, महेंद्र चौधरी,सोनु रॉय, करण टेकाम, श्रीधर चन्ने, पंकज चौधरी, प्रतिक भालेराव, एकनाथ वहिले, सौरभ रोकडे, भुवन रिनाईत, झलकसिंग बिसेन, नागो बन्सोड, दिलीप पाटील, कान्हा बघेले, कपील बावनथडे, गोंविद लिचडे, रमन उके, दर्पण वानखेडे, लव माटे, कुणाल बावनथडे, आकाश नागपुरे, सुलभ तुरकर, अशोक डोंगरे, सतिष पारधी, पंकज पटले, कशिश बागडे, ललित बिसेन, निरज नागरे, करिम खान, निरव वानखेडे, सोंविद मेश्राम, आरिफ पठान, राजेश तायवाडे, प्रमोद हटटेवार, इमरान शेख, मनोज नारनवरे, दिपक रिनाईत, आकाश मेश्राम, निर्मल श्रीवास्तव, नरेंद्र बेलगे, सतीश पारधी, रौनक ठाकुर, विक्रात तुरकर, गुणवंत मेश्राम व अन्य कार्यकर्ता उपस्थित होते

# गोंदिया-चंद्रपूर-बल्लारशा रेल्वे गाडी सुरू करा



**अर्जुनी मोरगाव:** गोंदिया-चंद्रपूर-बल्लारशा रेल्वे गाडी लवकरात लवकर सुरू करावी, तसेच जबलपूर -चंद्रपूर या गाडीचा थांबा देवलगाव (नवेगावबांध) येथे देण्यात यावे. अशी मागणी नवेगावबांध येथील रहिवाशांनी देशाचे केंद्रीय रेल्वेमंत्री यांना पाठवलेल्या निवेदनातून केली आहे.

नवेगावबांध व परिसरातील नागरिकांनी हे निवेदन गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अनिल देशमुख, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनील मेंढे, नागपूर रेल्वे विभागाचे डीआरएम यांनाही दिले आहे. नुकत्याच सुरू झालेल्या जबलपूर-चंद्रपूर या रेल्वे गाडीचा थांबा देवलगाव (नवेगावबांध) येथे देण्याची आग्रही विनंती या निवेदनातून करण्यात आली आहे. रेल्वे स्टेशन देवलगाव येथे तीन रोड (पटरी) ची सुविधा असून, दोन प्लेटफार्म ची व्यवस्था आहे. त्याबरोबरच दोन्ही बाजूला चढण्या- उतरण्यासाठी ओवर ब्रिज सुद्धा तयार झाले आहे. नवेगावबांध गावालगत रेल्वेस्टेशन देवलगाव या नावाने असून, येथे राष्ट्रीय उद्यान, व्याघ्र प्रकल्प तसेच पक्षी अभ्यासासाठी देशातून व विदेशा-तून लाखो पर्यटक येथे भेट देत असतात. त्याबरोबरच पर्यटनासाठी इटियाडोह धरण, झाशीनगर उपसा सिंचन प्रकल्प, पर्यटन संकुल, चारशे वर्षाची ऐतिहासिक परंपरा असलेले नवेगाव बांध जलाशय, नवोदय विद्यालय आहे. तसेच सुप्रसिद्ध प्रतापगड तिबेटी वसाहत, बंगाली वसाहत, आदिवासीबहुल ग्रामीण क्षेत्र परिसर आहे. राज्य व केंद्र शासनाचे पर्यटनाचा विकास व पर्यटनात वाढ करणे असे धोरण आहे. नवेगावबांध हे धान्य, तांदूळ याचे मोठे व्यापारी केंद्र असून, याठिकाणी हेलिपॅडची सुद्धा व्यवस्था आहे. या रेल्वे स्थानकावर थांबा मिळाल्यास पर्यटकांना येण्या जाण्याकरता रेल्वे सुविधा चा लाभ मिळणार आहे. तसेच पर्यटन वृद्धि सुद्धा होईल. गेल्या वर्षभरापासून लॉकडाऊनमुळे या मार्गावरील रेल्वे सुविधा ठप्प झाली आहे . त्यामुळे परिसरातील नागरिकांची फारच गैरसोय व कुचंबणा होत आहे. गोंदिया हे जिल्ह्याचे ठिकाण असून, अनेक कामासाठी स्थानिक व परिसरातील नागरिकांना गोंदियाला जावे लागते. अजुनी मोरगाव या आदिवासी व नक्षलग्रस्त तालुक्यातून जिल्ह्याच्या ठिकाणी नागरिकांना वारंवार जावे लागते. रेल्वे तिकीट दराच्या चारपट भाडे बसच्या तिकीटासाठी किंवा खाजगी वाहनांसाठी प्रवाश्यांना द्यावे लागते. त्यामुळे जास्तीचा आर्थिक भुर्दंड परिसरातील प्रवाशांना सहन करावा लागतो आहे.

या लॉकडाऊनच्या काळात बरीच आर्थिक झळ नागरिकांना बसलेली आहे. प्रवासाची मुबलक सुविधा नसल्यामुळे गोंदिया-चंद्रपूर-बल्लारशहा या रेल्वे गाडीचे नियमित सेवा देखील लवकरात लवकर सुरू करावी, अशी विनंती ग्रामवासी व परिसरातील नागरिकांनी या निवेदनातून केली आहे.

# ग्राम बाल संरक्षण समिती सदस्यांची प्रशिक्षण कार्यशाळा



**तिरोडा:-** येथील पंचायत समितीच्या सभागृहात पोलीस पाटील,अंगणवाडीसेविका यांच्यासह ग्राम बाल संरक्षण समिती सदस्यांची प्रशिक्षण कार्यशाळा दि.१९)शुक्रवारला पार पडली.

सदर प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन तिरोड्याचे पोलीस निरीक्षक योगेश पारधी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षणाला अतिथी म्हणून प्रभारी गटविकास अधिकारी डॉ.पी.एम .गांगापरी गटविकास,विस्तार अधिकारी सी.एच.गौतम,पोलीस उपनिरीक्षरक ए.डी.केंद्रे उपस्थित होते. प्रशिक्षण वर्गाचे प्रास्तविक प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी विनोदकुमार चौधरी यांनी करीत ग्राम बाल संरक्षण समितीचे महत्त्व पटवून दिले.तसेच बालविवाह व दत्तक विधान प्रक्रिया बालविवाह पॉक्सो कायदा लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण २०१२ यावर बालसरंक्षण अधिकारी गजानन गोबाडे यांनी मार्गदर्शन केले.समुपदेशक दिनेश कावडकर यांनी लैंगिक अत्याचारा पासून बालकांचे संरक्षण २०१२ या विषावर प्रकाश टाकला.सरंक्षण अधिकारी संजय शायमकुवर यांनी बाल मजुरी या विषयी माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूनेश नाकाडे यांनी केले,तर आभार धर्मेंद्र भेलावे यांनी मानले.सदर प्रशिक्षणाला पोलीस पाटील व अंगणवाडी सेविका उपस्थित होते.

# सौ. प्रेमजीत सुनील गतीगंते यांना कर्तृत्ववान महिला पुरस्कार प्रदान




**मुंबई:** मुंबई येथील श्रीनिवास बागरका कनिष्ठ महाविद्यालय, कला, वाणिज्य व विज्ञान, जे.बी. नगर, अंधेरी पूर्व येथील इंग्रजी भाषा शिक्षिका, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेते, ब्लॉगर आणि स्टोरीमिररवरील नामांकित कवयित्री सौ. प्रेमजीत सुनील गतीगंते यांना राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिलेचा पुरस्कार त्यांची आई श्रीमती तरणजित कौर बलदेवसिंग धालीवाल यांचे हस्ते २० मार्च रोजी प्रदान करण्यात आले. त्यांनी Let's Explore English with Premjit Gatigante या विषयावर उपक्रम सादर केला होता. त्यांचा उपक्रम महाराष्ट्रातील सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली आहे. हा उपक्रम ९ महिन्यांपासून कॉलेजच्या ऑनलाइन अध्यापनातून राबवित असून आजपर्यंत ३७,७१७ दर्शक आहेत.त्यांना आतापर्यंत संस्थेचा आदर्श शिक्षिका हा पुरस्कार देखील मिळालेला आहे.

श्रीमती तरणजित कौर बलदेवसिंग धालीवाल यांचे कडून पुरस्कार स्वीकारतांना, पुरस्कार वितरण प्रसंगी त्यांचे नवरा श्री. सुनील सूर्यनारायण गतीगंते , पुत्र कु. खुशाल सुनील गतीगंते धाकटा भाऊ श्री. जसवीर सिंह बलदेवसिंग धालीवाल, भाची कुमारी अमनप्रीत कौर भट्ट आदी कुटुंबीय उपस्थित सोबत होते.

मातृसेवा फाउंडेशन ठाणे, स्माईल टीम यवतमाळ आणि शिक्षक ध्येय महाराष्ट्र यांच्या मार्फत हा पुरस्कार देण्यात आला. राज्यातील महिलांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती इतर सर्व नागरिकांना व्हावी याच हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या कार्याला उत्तेजन देणे, त्यांचे कौतुक करून, प्रोत्साहनासह त्यांच्यातील कर्तृत्व वाढीस लावणे हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश होता. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे होते. राज्यातील १०७ महिला या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या त्यातील ४६ महिलांना ङ्कर्तृत्ववान महिला पुरस्कारफ देण्यात आला, असे मशिक्षक ध्येयफ मासिकाचे संपादक मधुकर घायदार यांनी सांगितले.

# सडक अर्जुनी तालुक्यातील सेतू केंद्राची तपासणी



**सडक अर्जुनी :** जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये जिल्ह्यातील नागरिकांमध्ये व सेतू केंद्रामध्ये पारदर्शकता राहावी, जनतेची लुबाडणूक होऊ नये व सामान्य नागरिकांचे सेतू केंद्राकडे पाहण्याचा दृष्टीकोनमध्ये बदलाव अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सेतू केंद्र तपासणी पथक तयार करण्यात आलेले आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील तपासणी पथक समुहाने सडक अर्जुनी तालुका अंतर्गत सेतू केंद्राची तपासणी केली. तपासणीमध्ये अरविंद

पातोडे व अंकीत गुप्ता या केंद्रचालकाने शासन निर्णयानुसार ङ्गआपले सरकार सेवा केंद्रफ्चे फलक केंद्राला लावलेले नसल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सदरील सेतू केंद्राला ५ हजार रुपयाचा दंड लावण्यात आलेले आहे. तसेच पलिंद्र अंबादे यांचे मुळ सेतू केंद्र महिला बचत गट प्रो.प्रा.पलिंद्र अंबादे यांचे नावे असलेली सेतूची आय.डी. त्यांचा मुळ कार्यालय महिला बचतगटला कामाकरीता देण्यात आलेली होती. परंतू बचतगट प्रामुख्याने सेतू

केंद्राची आय.डी. दुस?्याला देवून (प्रशांत झेराक्स) तहसिल कार्यालय सडक अर्जुनी च्या समोर २० मीटर अंतरावर हलविण्यात असल्याचे निदर्शनास आले आहे. शासन निर्णयानुसार गंभीर चूक असून जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सदरील सेतू केंद्र कायमस्वरुपी बंद करण्याबाबत सक्तीचे आदेश देण्यात आलेले आहे.

सदर तपासणी पथकामध्ये माहिती तंत्रज्ञान विभागाचे एच.जी.पौनीकर व विशाल बागडदे उपस्थित होते. तहसिल कार्यालय सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव येथील सेतू केंद्राची सुध्दा तपासणी स्वतंत्र पथकाद्वारे अर्जुनी मोरगाव उपविभागीय अधिकारी श्रीमती शिल्पा सोनाले यांनी केलेली आहे. जिल्ह्यात पुढेही असेच आकस्मित सेतू केंद्राची तपासणी करण्याची कार्यवाही सुरु राहील. असे निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे यांनी कळविले आहे.

# भंडारा शहरात वाहतुक सिंगलनचे लोकार्पण



**भंडारा:** शहरातील कलेक्टर ऑफिस चौक, पोस्ट ऑफिस चौक, मुस्लिम लायब्ररी चौक, कुकडे नर्सिंग होम चौक, लाल बहाद्दूर शास्त्री चौक, नागपूर नाका चौक या प्रमुख चौकांमध्ये नगर परिषद भंडारा तर्फे नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत ५८ लक्ष रुपये किंमतीचे ट्रॅफिक सिग्नल बसविण्याचे काम पूर्णकरण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण सोहळा आज नगराध्यक्ष तथा खासदार सुनील मेंढे यांच्या हस्ते करण्यात आले. या व्यवस्थेमुळे शहरातील वाहतुकीला वळण लागून अपघात कमी होण्यास मदत होईल असा विश्वास खासदार सुनील मेंढे यांनी व्यक्त केला.

जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या भंडारा शहरात वाहतूकीला वळण लागण्याच्या दृष्टीने ट्रॅफिक सिग्नलची व्यवस्था नव्हती. शहरातील प्रमुख चौकांमध्ये लोकांची होत असलेली गदी नियंत्रणात आणण्यासाठी ही यंत्रणा अत्यंत गरजेची होती. यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विनोद जाधव, वाहतूक पोलीस निरीक्षक शिवाजी कदम, गटनेते विनयमोहन पशिने, शमीम शेख, जुगल भोंगाडे उपस्थित होते.

शास्त्री चौकात प्रत्यक्ष उपस्थित राहून या मंडळींनी फित कापून तर अन्य चौकांमध्ये आभासी पद्धतीने हा कार्यक्रम घेतला गेला. राष्ट्रीय महामार्गावरील जिल्हाधिकारी चौक व शहरातील अन्य प्रमुख चौकांमध्ये ही व्यवस्था उभी करण्यात आली आहे. अपघाताचे प्रमाण कमी होऊन लोकांचे प्राण वाचविले जाऊ शकतील. नागरिकांनी या वाहतूक नियमांचे पालन काटेकोरपणे पण करावे, असे आवाहन यावेळी खासदार सुनील मेंढे यांनी केले.

## शिवसेना जिल्हाप्रमुख शिवहरेंनी घेतली कोरोना लस

**गोंदिया:-** कोरोना विषाणूवर विजय मिळविणे सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. ग्रामीण व शहरी भागातील जनतेने कोरोनाला हद्दपार करण्यासाठी स्वतः सावधगिरी बाळगली पाहिजे. घराबाहेर पडताना मास्क लावणे बंधनकारक आहे. सुरक्षित अंतर ठेवून गदी टाळावी. कोरोना विषाणूवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक सरकारच्यावतीने जिल्हा रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात कोवीडशील्ड लस उपलब्ध झाली आहे. मनात कोणतीही भीती व शंका न बाळगता लस घेण्यासाठी तत्परतेने पुढे येवून लसीकरण करावे, असे आवाहन शिवसेना गोंदिया जिल्हाप्रमुख मुकेश शिवहरे यांनी केले आहे.शिवहरे यांनी आज जिल्हा सामान्य रुग्णालयात कोवीडशील्ड लस घेतली,त्यानंतर ते बोलत होते.यावेळी उपजिल्हाप्रमुख सुनिल लांजेवार,वैदयकीय अधिकारी डॉ.सुर्वणा हुबेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

# सुप्रीम कोर्टाचे खंडपीठ नागपुरातही स्थापन करावे-अहीर



**चंद्रपूर:** देशातील १३५ कोटी लोकसंख्येकरिता असलेली सवीच्च न्यायपालीका राजधानी दिल्लीत असल्यामुळे संपूर्ण देशभरातील राज्यांमधील नागरीकांना न्यायासाठी फार विलंब लागतो. त्यामुळे न्यायासाठी प्रतिक्षेत असलेल्या मोठ्या संख्येतील लोकांना सुप्रीम कोर्टातून न्याय मिळण्याकरिता अनेक वर्ष उलटतात परिणामी अशा लोकांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास सोसावा लागतो. ही बाब विचारात घेऊन संसदीय समितीने आपला १०७ वा अहवाल संसदेसमोर नुकताच सादर करून देशात सुप्रीम कोर्टाचे चार खंडपीठ स्थापन करून न्यायव्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या गरजेवर भर दिला आहे.

सन २००७ मध्ये चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचे तत्कालीन खासदार हंसराज अहीर यांनी प्रायव्हेट बिल व संविधान संशोधन विधेयकाव्दारे मध्यभारतातील नागपुरात सवीच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्यात यावे अशी मागणी लोकसभेत केली होती. एवढेच नव्हे तर या मागणीसाठी अहीर यांनी तत्कालीन प्रधानमंत्री, केंद्रीय न्याय मंत्री यांना पत्र लिहले होते. संसदीय समितीने अशा खंडपीठांची आवश्यकता असल्याची शिफारस करून हंसराज अहीर यांच्या जागरूक भुमिका व दुरदृष्टीवर एकप्रकारे शिक्कामोर्तब केले आहे. १४ व्या लोकसभेत तत्कालीन खासदार हंसराज अहीर चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करतांना मध्यभारतातील लोकांचे सवीच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांची सुनावणी अशा खंडपीठांच्या माध्यमातून लवकर मार्गी लागून त्यांना अविलंब न्याय मिळेल याकरिता मध्यभारत व दक्षिणी राज्यातील लोकांकरीता मध्यवती असलेल्या नागपूरात सुप्रिम कोर्टाचे खंडपीठ स्थापन करण्यात यावे अशी मागणी संविधान संशोधन विधेयकाव्दारे केली होती.

या संदर्भात त्यांनी लोकसभेत प्रश्न विचारला होता. तत्कालीन लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चॅटजी यांनी हा अतिशय महत्वपूर्ण प्रश्न असल्याची टिपन्नी केली होती. नागपूरात खंडपीठाची स्थापना झाल्यास मध्यभारतातील महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तामीलनाडु, केरळ राज्यांसह पुडूचेरी व अंदमान निकोबारमधील लोकांना हे खंडपीठ राजधानी दिल्लीच्या तुलनेत कमी अंतरावर पडेल त्यामुळे लोकांचा मानसिक व आर्थिक त्रास दूर होऊन त्यांना लवकर न्याय मिळेल असे सांगितले होते. हंसराज अहीर यांनी लोकसभेत खंडपीठ स्थापण्यासंबंधी विधेयक सादर केल्यानंतर राज्यातील न्याय क्षेत्रातील संबंधित अनेक मान्यवरांनी, वकील संघटनांनी त्यांच्या या मागणीचे स्वागत केले.

चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशने एका कार्यक्रमात हंसराज अहीर यांनी अत्यंत महत्वपूर्ण विषयाला हात घालुन न्यायव्यवस्थेबाबत आस्था दाखविल्याने त्यांच्या या भूमिकेचे गौरवपूर्ण शब्दात स्वागत केले होते. आता खुद्द संसदीय समितीनेच सुप्रिम कोर्टाच्या नव्या चार खंडपीठांच्या स्थापनेची संसदेत शिफारस केल्याने या बाबीला विशेष महत्व प्राप्त झाले असुन या पाश?वभूमीवर भारत सरकारने नागपूर येथे सवीच्च न्यायालयाचे खंडपीठ देवून या मागणीचा सन्मान करावा व मध्यभारतातील लोकांना न्याय द्यावा अशी अपेक्षावजा मागणी पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी केली.


**कार्यालय**
**ग्राम पंचायत सितेपार**
**पंचायत समिती आमगाव, जि.गोंदिया**
**ई-निविदा क्रमांक-१**
**(पहिली वेळ)**

**दिनांक-२२/०३/२०२१**

या ई-निविदा सुचनेद्वारे सर्व इच्छुक साहित्य पुरवठा धारकांना सुचित करण्यात येते कि, ग्रामपंचायत सितेपार अंतर्गत आर्थिक वर्ष २०२१-२०२२ करिता १५ वित्त आयोग व इतर विविध विकास योजनांच्या कामाकरिता लागणाऱ्या साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहचते दरानी फक्त दरपत्रक मांगविण्यात येत आहे. तरी पुरवठा धारकांनी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अटी व शर्ती लक्षात घेऊन बंद लिफाफ्यात खालील दर्शविलेल्या ठराविक मुदतीत पाठवावे.

**ई-निविदा वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक २२/०३/२०२१ पासून |
| ई-निविदा दस्तावेज डाऊनलोड प्रारंभ व समाप्त | दिनांक २२/०३/२०२१ पासून २९/०३/२०२१ पर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवाती दिनांक | दिनांक २२/०३/२०२१ २.०० वाजता पासून |
| ई-निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २९/०३/२०२१ दुपारी ५.०० वाजे पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक ३१/०३/२०२१ सकाळी ११.०० वाजता (शक्य झाल्यास) |

विविध योजनेतील २०२१-२०२२ करिता विविध योजनेंतर्गत बांधकामाकरिता लागणारे साहित्य यांच्या विषयी संपूर्ण तपशील महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर उपलब्ध आहे. पुरवठादाराला सदर निविदा ऑनलाईन भरायची आहे. काही अडचण असल्यास ग्रामपंचायत सितेपार येथे कार्यालयीन वेळेवर संपर्क साधावे.

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सितेपार**

**सरपंच**
**ग्रामपंचायत सितेपार**

# स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी प्रवर्गाच्या आरक्षणाबाबत राज्य शासनाकडून पुनर्विचार याचिका दाखल

**मुंबई :** सवोच्च न्यायालयाच्या त्रिस्तरीय समितीने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये मागास प्रवर्गाच्या सर्व जागा रिक्त ठेवण्याचा आदेश दिला आहे. या आदेशाबाबत राज्य शासनाने पुनर्विचार याचिका दाखल केली असून इतर मागास प्रवर्गाचे राजकीय आरक्षण कायम राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले आहे. न्यायालयात राज्य सरकारच्या वतीने ॲड.कपिल सिब्बल मागासवर्ग प्रवर्गाची बाजू मांडणार असल्याची माहिती वडेट्टीवार यांनी दिली आहे. यासंदर्भात आयोजित बैठकीत श्री.वडेट्टीवार बोलत होते.

यावेळी श्री. वडेट्टीवार म्हणाले, इतर मागास प्रवर्गाला घटनेने दिलेले २७ % आरक्षण अबाधित राहावे यासाठी सोमवारच्या सुनावणीमध्ये भक्कमपणे बाजू मांडण्यात येणार आहे.या संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी रविवार दि. २१ मार्च रोजी नवी दिल्ली येथे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) आरक्षणाबाबत



राज्याची याचिका दाखल करणारे ॲड. राहुल चिटणीस, ॲड. कपिल सिब्बल, आणि महाधिवक्ता ॲड. आशुतोष कुंभकोणी यांच्यासोबत या विषयाबाबत सविस्तर माहिती घेऊन सखोल चर्चा करणार असल्याचे तसेच यावेळी क्रीडामंत्री सुनील केदारही उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सवोच्च न्यायलयाच्या निर्णयान्वये राज्यातील ५० % पेक्षा अधिक आरक्षण असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागास प्रवर्गाचे (जइउ) ५० % वरील आरक्षण रद्दबातल केले आहे. या निर्णयामुळे राज्यातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील नागरिकात असंतोष आहे. या प्रकरणी घटनापीठाचा निर्णय अंतिम होईपर्यंत व राज्यातील कोव्हिड – १९ चा प्रसार पाहता राज्यातील सध्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या होऊ घातलेल्या निवडणुकीस स्थगिती देऊन त्या एक वर्ष पुढे ढकलण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाला कळविण्यात यावे, अशी विनंती मुख्यमंत्री यांच्याकडे केली असल्याचे श्री. विजय वडेट्टीवार यांनी यावेळी सांगितले.

# आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळेच आरक्षण रद्द-बावनकुळेंचा आरोप

**नागपूर:** स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींचे आर–क्षण रद्द होण्यास महाविकास आघाडीचा नाकर्तेपणाच जबाबदार असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, माजी ऊर्जा व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत केला.

ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाचा ४ मार्चला निकाल आला. त्यात ओबीसींच्या आरक्षणाबद्दलचा आदेश आहे. या निकालात स्पष्ट म्हटले आहे की, राज्य शासन ओबींसींचा राज्यातील इंपिरिकल डाटा उचित आयोग नेमून सर्वोच्च न्यायालयात मांडू शकले नाही. त्यामुळे ओबीसींना आरक्षण ठरवता येत नाही. निवडणूक आयोगाचे १६ मार्चला जिल्हाधिकाऱ्यांना पत्र आले. त्यात राज्य निवडणूक आयोगाने ओबीसींच्या सर्व जागा रद्द करून जनरल कॅटेगिरीत टाकल्या आहेत.

ग्राम पंचायतसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांमध्ये ओबीसींचे आरक्षण आता राहणार नाही, जोपर्यंत उचित आयोग नेमून, डाटा तयार करून, कायदा तयार करून आरक्षण देत नाही. १४ महिन्यांपासून राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयातील या याचिकेकडे दुर्लक्ष केले आहे. १४ महिन्यात सातवेळा वेळ मागून घेतली. पण, राज्य सरकार तसेच ओबीसींच्या गोष्टी करणारे सर्व



मंत्री उदासीन होते. आयोग तयार केला नाही. म्हणून आता ओबीसी समाजावर ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

एस्सी, एसटी व ओपन एवढेच आरक्षण आता सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राहणार आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी ओबीसींसंदर्भात एक अध्यादेश काढला होता की, ओबीसींचे २७ टक्के आरक्षण कायम ठेवावे. आघाडी सरकारने त्याचे कायद्यात रूपांतर केले नाही. सरकारने लक्ष दिले नाही. आता ते अंगलट आले तेव्हा हे भाजपचे पाप असल्याची ओरड करीत आहेत. पण, आघाडी सरकारने आयोगही नेमला नाही.

आता खेड्यांपासून नगरपंचायत वगैरे प्रत्येक स्तरावर डाटा तयार करावा लागणार आहे. तामिळनाडूसारखे करता आले असते. आजही ही केस कोण लढणार आहे, हे स्पष्ट नाही. महाविकास आघाडीने ओबीसी समाजावर मोठा अन्याय केला आहे. आघाडी सरकारने तातडीने ही जबाबदारी घ्यावी. तातडीने सर्वोच्च न्यायालयात जाऊन वेळ मागावी. तातडीने आयोग नेमून, डाटा तयार करायला हवा.

मात्र, आघाडी सरकारचे समाजाकडे लक्ष नाही. अधिकाऱ्यांना वाचवण्याकडे, विरोधकांची मुस्कटदाबी करण्याकडे लक्ष आहे, असा घणाघाती आरोप करीत बावनकुळे यांनी आघाडी सरकारचा निषेध केला. ओबीसींचे आरक्षण घालवणाऱ्या या महाविकास आघाडीला माफ करणार नाही. या सरकारविरुद्ध आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही, असे बावनकुळे म्हणाले. आ. कृष्णा खोपडे, आ. टेकचंद सावरकर, ग्रामीण भाजप अध्यक्ष अरविंद गजभिये, प्रसिद्धी प्रमुख चंदन गोस्वामी, सुनील मित्रा पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

# अर्ध्या एकरात ८० हजाराचे हळदीचे उत्पादन

**अर्जुनी मोरगाव:** पारंपारिक शेतीला बगल देऊन विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरुन शेतीमधून नवनवीन पध्दतीचे उत्पादन काढण्यात हातखंडा असलेल्या नवेगांवबांध येथील महिला शेतकरी मनीषा किशोर तरोणे यांनी आपल्या अर्धा एकर शेतीत प्रायोगिक तत्त्वावर केवळ नऊ महिन्याच्या कालावधीत ८० हजार रुपयांच्या हळदीचे उत्पादन घेतले आहे. त्यांचा हा प्रयोग परिसरातील शेतक?यांना प्रोत्साहन देणारा ठरत आहे. तालुक्यातील मुळचे सावरटोला येथील रहिवासी असलेले व सध्या नवेगांवबांध येथे वास्तव्यास असलेल्या मनीषा तरोणे यांच्याकडे २० एकर शेती आहे. तरोणे दाम्पत्यांकडे अनेक प्रकारचे उद्योग असले तरी शेती हा त्यांचा प्रमुख व आवडता उद्योग आहे.

धान हे मुख्य पीक असले तरी दरवर्षीच ते आपल्या शेतीत पारंपारिक पीक पध्दतीमधे बदल करुन नवनवीन पध्दतीचे उत्पादन घेतात. आजपर्यंत मनीषा तरोणे यांनी आंबाडीसह टरबूज, मका, मेहरी, जवस, लाखोरी, गहू हरभरा यासारख्या कडधान्य पिकासह विविध प्रकारचे भाजीपाला पिकांचे उत्पादन घेत आहेत. यावर्षी मनीषा तरोणे यांनी नवेगांवबांध येथील बाजार समितीच्या मागे असलेल्या आपल्या अर्धा एकर शेतजमीनीत हळद पिकांची लागवड केली. शेतात विविध पीके सुधारीत पध्दतीने घेता यावी म्हणून त्यांनी ठिंबक सिंचन व्यवस्था तयार केली आहे.

यवतमाळ येथून त्यांनी चार क्विंटल वायगाव हळदीचे बियाने आणून अर्धा एकर शेतीमध्ये हळदीची लागवड केली. हळद पिकाला उत्पादन निघेपर्यंत नऊ महिण्याचा कालावधी लागतो, असे मनीषा तरोणे यांनी सांगितले. अर्धा एकर शेतीत ३० क्विंटल ओली हळद तयार झाली. शेतामध्येच ओल्या हळदीवर मजुरांच्या साहाय्याने प्रक्रिया केली. हळद प्रक्रियेनंतर शुध्द १० क्विंटल हळदीचे उत्पादन हाती आले आहे. त्याची आज बाजारभावाप्रमाने ८० ते ८५ हजार रुपये किंमत होत असल्याचे त्यांनी सांगितले. या हळद उत्पादनात अर्धा एकरात खर्च वजा जाता ३० ते ३५ हजाराचा नफा होणार असल्याचे महिला शेतकरी त्यांनी सांगितले.

# राज्यात मानद वन्यजीव रक्षकांच्या नियुक्त्या

**नागपूर:** वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार प्रदत्त शक्तींचा वापर करुन वनविभागात मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती दर तीन वर्षासाठी करण्यात येते. याच अंतर्गत राज्यात मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती करण्यात आल्या आहे. नागपुर जिल्ह्यात रोहित कारु, अजिंक्य भटकर, उधमसिंह यादव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.


मानद वन्यजीव रक्षक हे पद वनविभागातंर्गत अतिशय प्रतिष्ठेचे पद समजले जाते. एवढेच नाही तर नागरिक आणि वनविभाग यांच्यातील हे दुवा असतात. वनात घडणाऱ्या प्रत्येक संघर्षमय प्रसंगात यांची भुमिका ही महत्वाची असते. त्यामुळे राज्य शासनाकडून विशेष अधिकार वापरुन या पद–



ावर वन, वन्यजीव क्षेत्रात कार्य करणाऱ्यांची नियुक्ती केली जाते. भंडारा जिल्ह्यात शाहीद परवेज खान, नदीम खान, गोंदिया जिल्ह्यात मुकुंद धुर्वे, सावन बहेकार, अमरावती जल्ह्यात डॉ. सावन देशमुख, डॉ. जयंत वडतकर यवतमाळ जिल्ह्यात डॉ. रमजान विराणी, श्याम जोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय राज्यातील २६ जिल्ह्यात मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# एकाच अर्जावर अनेक योजनांचा लाभ

**गोंदिया:** राज्य शासनाच्या महाडीबीडी पोर्टलवर शेतकरी योजना या शिर्षकांतर्गत विविध कृषी विषयक योजनांचा लाभ



घेण्यासाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या सुविधेतंर्गत लाभााथ्र्यांनी आपल्या नावाची नोंदणी करावयाची असून एकच अर्जाद्वारे अनेक योजनांचा लाभ त्यांना घेता येणार आहे.

२०२१–२२ करिता अर्ज स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेमध्ये ज्या शेतकऱ्यांनी २०२०–२१ मध्ये महाडीबीडी पोर्टलवर अर्ज `केला आहे. परंतु त्यांची कोणत्याही योजनेसाठी निवड झाली नाही. त शेतकरी त्यांच्या अर्जातील बाबीमध्ये बदल करु शकतील. असे अर्ज २०२१–२२ करिता ग्राह्य धरले जातील. त्याकरिता त्यांच्याकडून पुन्हा शुल्क आकारले जाणार नाही. २०२१–२२ करिता वरील अर्जातील ज्ळा बाबींकरिता अर्ज केलेला नाही त्या बाबींचा अर्जामध्ये विनाशुल्क समावेल करता येईल. म्हाडीबीटी पोर्लटवर शेतकरी योजनाा या सदराखाली शेतकऱ्यांच्या सोयीकरिता सर्व योजनांचा लाभ एकाच अर्जाद्वारे देण्याच्या दृष्टीने अर्ज करण्यापासून ते प्रन्तक्ष लाभ मिळेपर्यंत एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत केलेली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या बाबींच्या निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आले असून शेतकऱ्यांनी शेती निगडीत विविध बाबींकरिता अर्ज करावयाचा आहे. महाडीबीटी पोर्टलचे हे संकेतस्थळ आहे. संकेतस्थळावरील शेतकरी योजना हा पर्याय निवडावा. शेतकरी स्वत:च्या मोबाईल, संगणक, लॅपटॉप, टॅबलेट सामुदायिक सेवा केंद्र, ग्रामपंचायतीतील संग्राम केंद्र आदि माध्यमातून वरील संकेतस्थळावर जाऊन अर्ज करु शकतील. वैयक्तिक लाभार्थी म्हणून नोंदणी करु इच्छिणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना त्यांचा आधार क्रमांक सदर संकेतस्थळावर प्रमाणित करुन घ्यावा लागेल. ज्या वापरर्त्यांकडे आधार क्रमांक नसेल त्यांनी प्रथम आधार नोंदणी केंद्राकडे जाऊन त्यांची नोंदणी करावी व सदर नोंदणी क्रमांक महाडीबीटी पोर्टलमध्ये नमूद करुन त्यांना योजनांसाठी अर्ज करता येईल. अशा अर्जदारांना अनुदान वितरित करण्यापुर्वी महाडीबीडी पोर्टलमध्ये त्यांना देण्यात येणारा आधार क्रमांक नोंदणीकृत प्रमाणित करुन घ्यावा लागेल. त्याशिवाय त्यांना अनुदानाचे वितरण करण्यात येणार नाही. या कामासाठी आपण आपल्या जवळच्या सामूहिक सेवा केंद्राची मदत घेऊ शकता तसेच यामध्ये कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास ०२०–२५५११४७९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधा–वा. असे आवाहन कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांनी केले आहे.

# वनवभिागाच्या जलस्त्रोतांचा हिशेबच लागेना



**गोंदिया:** उन्हाळ्यात वन्यजीवांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होऊ नये म्हणून वन परिसरातील नैसर्गिक पाणठ्याशिवाय कृत्रिम पाणवठ्याची सोय वन्यजीव व वनविभागाकडून करण्यात येते. त्यानुसार यंदा वन्यजीव विभागाचे ३८० पानवठे उपलब्ध असताना मागील तीन वर्षांपासून जलस्त्रोतांची माहितीच वनविभागाकडे नसल्याचे वास्तव पुढे आले. परिणामी वन्यप्राण्यांप्रती वन विभाग किती सजग आहे हे दिसते.

गोंदिया वन विभागाच्या अखत्यारीत १७३३.१०५ चौरस किमी वनक्षेत्र येत असून वनक्षेत्राची टक्केवारी ४६.६५ टक्के आहे. यात बारा वनपरिक्ष, दोन डेपो आहेत. त्यात ५८ सहवनक्षेत्र व २७४ नियत क्षेत्र आहेत. तर वन्यजीव विभागांतर्गत ४८३.१७२ चौरस किमी वन विकास महामंडळाच्या अखत्यारीत ३२७.३१७ चौरस किमी वनक्षेत्र येते. विशेष म्हणजे या परिसरातच नागझिरा–नवेगावबांध, न्यू नागझिरा अभयारण्य, बफर झोन येत असून वाघ, बिबट, अस्वल, नीलगाय, रानकुत्रे, हरिण, ससे आदी प्राण्यांचा येथे अधिवास आहे. उन्हाळ्याच्या दिवसात उन्हाची दाहकता वाढताच जंगल परिसरातील वनतलाव, बोड्या कोरड्या पडतात. परिणामी तहान भागविण्याचा प्रश्न निर्माण होतो. वन्यप्राणी पाण्याच्या शोधार्थ शहर व गावाकडे धाव घेतात. त्यामुळे वन्यप्राण्यांसह गावकऱ्यांनाही धोका असतो. यातूनच शिकारीच्या घटनांमध्येही वाढ होते.

वन्यप्राण्यांची भटकंती थांबावी, त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, यासाठी वन्यजीव व वनविभागाकडून पाणवठ्याच्या माध्यमातून पाणी पुरविले जाते. मात्र, वन विभागाकडून सन २०१७–१८ या वर्षांपासून याकडे दुर्लक्ष होत असल्याचे वन विभागाच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे. सन २०१७–१८ या वर्षी ६१४ जलस्त्रोतांची व्यवस्था करण्यात आली होती. ज्यामध्ये १६९ नैसर्गिक तर ४४५ कृत्रिम जलस्त्रोत होते. तर सद्यस्थितीत वन विभागांतर्गत किती जलस्त्रोत आहेत. याचे अपडेटच वन विभागाकडे नाही. त्यातच दुसरीकडे वन्यजीव विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार १३२ नैसर्गिक व २४८ कृत्रिम पानठ्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

सध्याचे चित्र पाहता उन्हाळ्याच्या सुरुवातीला तरी वन्यप्राण्यांची तहान भागेल अशी व्यवस्था उपलब्ध आहे. असे असले तरी सद्य पानवठ्यांची अवस्था कशी आहे. त्यातील गाळ उपसण्यात आले अथवा नाही हा प्रश्न निर्माण होत असून भर उन्हाळ्यात वन्यप्राण्यांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**वन्यप्राण्यांना तहान भागविता यावी, यासाठी वनांमध्ये असलेले नैसर्गिक पाणवठे व वनविभागाकडून निर्माण करण्यात आलेले कृत्रीम पाणवठे सध्या तरी पुरेसे आहेत. भविष्यात वन्यप्राण्यांसाठी पाण्याची गरज भासल्यास तशी व्यवस्था करण्यात येईल. त्यासाठी रितसर प्रस्ताव वरिष्ठांना पाठविण्यात येईल.**

**राजेंद्र सदगीर,**
**सहायक वनसंरक्षक वन विभाग, गोंदिया**

### पाण्यासाठी असा केला खर्च

जलस्त्रोतांच्या कामाचा आलेख पाहता सन २०१२–१३ ते २०१४–१५ या कालावधीत मग्रारोहयोअंतर्गत १५ वनतळे, ४० सिमेंट साठवण बंधारे अशी ५५ कामे झालीत. २०१२–१३ ते २०१५–१६ या वर्षांमध्ये नक्षलग्रस्त भागासाठी केंद्र शासनाच्या आयएपीकडून मिळालेल्या निधीतून ५ वनतळे, ३६ बोरवेल, १ सिमेंट साठवण बंधारा अशी ४२ कामे झालीत. त्याचबरोबर २०१४–१५ ते २०१५–१६ या दोन वर्षांमध्ये जलयुक्त शिवार योजनेंतर्गत १४४ जलसंधारणाची कामे वनविभागाकडून केल्या गेली. त्यावर ८ कोटी २० लाख ७२ हजार ४०० रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. २०१६–१७ या कालावधीत वनयोजनेंतर्गत १३ वनतळ्यांची कामे करण्यात आली असून त्यावर २५ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. त्यानंतर अहवाल मात्र, वन विभागाकडे नसल्याचे वन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार दिसून येत आहे.

# अभिकर्ता संघटनेचे कामबंद आंदोलन, कार्यालयीन कामकाज ठप्प

**गोंदिया :** केंद्र शासनाने रचलेला खाजगी करणाचा डाव तसेच निगमच्या वतीने काही पॉलिसी ऑनलाईनचा सुरू केलेला धंदा तसेच अभिकर्त्यांविरोधात सुरू असलेले षडयंत्र या मागणीला घेवून आयपीओ विनिवेशच्या विरो–धात (ता.२३) संपूर्ण देशात भारतीय जीवन बिमा निगमच्या अभिकर्त्यांच्या वतीने कामबंद आंदोलन करण्यात आले. गोंदिया येथील शाखेत सकाळी १० वाजेपासूनच अभिकर्त्यांनी हजेरी लावली. केंद्र शासन व निगमचा विरोध केला. यामुळे आज दिवसभर कार्यालयीन कामकाज ठप्प पडले. या आंदोलनाने सुमारे एकट्या गोंदिया शाखेचे ५० लाख रुपयाचे नुकसान झाल्याचे माहिती आहे.

ऑल इंडिया अभिकर्ता संघटनेच्या वतीने आलेल्या निर्देशानुसार गोंदिया येथील अभिकर्त्या संघटनेच्या वतीने (ता.२३) रेस्ट डे म्हणून घोषित करण्यात आला. तसेच संपूर्ण कामबंद आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला. ज्या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले, त्यामध्ये ऑनलाईन विमा विक्रीवर बंदी, अभिकर्त्यांचे कमिशन अनुमानित दरानुसार देण्यात यावे, अभिकर्त्यांची ग्रॅच्युएटी अधिनियमावर आणण्यात यावी तसेच नॉन क्लब अभिकर्त्यांसाठी मेडिकेल्म विमा योजनेचा लाभ देण्यात यावा तसेच



कुटुंबियातील सर्वांचा समावेश करण्यात यावा, यसह अभिकर्त्यांच्या मुख्य मागण्या निगमने पूर्ण करावे तसेच केंद्र शासनाने रचलेला खाजगीकरणाचा डाव उधडून लावावा या मुख्य मागणीला घेवून हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाने शाखेचे जवळपास ५० लाख रुपयाचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती आहे. या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष सोमेश्वर ब्राम्हणकर, सचिव भुवन रिनाईत, कोषाध्यक्ष दिनेश माधवानी, उपाध्यक्ष नरसिंग गहरवार, सुनिल चव्हाण, रवि क्षिरसागर, प्रवीण शर्मा, भुवन रहांगडाले, प्रमोद सुर्यवंशी, धर्मानंद मलीक, जोगेंद्र देशमुख, लंकेश कटरे, विनय मेहर, अनिल मोटघरे, दिपक पवार, सुनिल कटरे, तिर्थराज पारधी यासह मोठ्या संख्येने अभिकर्ते सहभागी झाले होते.


## विदर्भ पाटबंधारे विभाग महामंडळ,नागपुर
### (महाराष्ट्र शासनाचा अधिकृत उपक्रम)
### कार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया ४४१६०१

**ई-मेल** mpdg.gondia@gmail.com
**ई-निविदा सुचना क्र.०७ सन २०२०-२०२१(दुसरी वेळ)**
**संकेत स्थळ :** http://mahatenders.gov.in

**मंडळ :** अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर
**विभाग:** कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया
**पत्ता:**सुभाष बोस गार्डन जवळ सिव्हिल लाईन गोंदिया दु. ०७१८२–२३४८३२

कार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया खालील कामाकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गात पंजीकृत व असलेल्या कंत्राटादाराकडून ऑनलाइन ई–निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची एकुण अंदाजित रक्कम लक्ष | इसारा/बयाना रक्कम (लक्ष) | ई–निविदा संचाची किंमत | पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | Estimate For Appointment of Private Consultant for NBWL Clearance of remaining Canal Works of Zashinagar Lift Irrigation Scheme. | रु.१०.९४ लक्ष | रू.०.११ लक्ष | रू.२०००+१२% जीएसटी= २२४०/- | वर्ग ६ व त्यावरील | ६ महिने |

**अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २४/०३/२०२१ ते ०१/०४/२०२१ १७.४५ वाजेपर्यंत**
**आ) निविदा पूर्व बैठक :- लागू नाही**
**इ) निविदा उघडणे ::-दिनांक ०५/०४/२०२१ (वेळ १२.०० वाजता)**

(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)

१) आंतराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असेल तरच या निविदेत भाग घेऊ शकतील.
२) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई–निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत तथापी कंत्राटदाराने संबंधित वेबासाईटवरुन ऑनलाईन डाऊनलोड करावे.
३) सविस्तर ई–निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक टेन्डर management http://mahtenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
४) या कामाचे अंदाजपत्रक,दर,विश्लेषण,मोजमापे नकाशे इ. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.
५) सदर कामाकरीता पश्चात मुल्यांकन पध्दती लागू आहे.

**कार्यकारी अभियंता**
**मध्यम प्रकल्प विभाग**
**गोंदिया**

क्र./जिमका/गों/जाहि/५२/२०२१


# जागतिक जलदिनानिमित्त जिल्ह्यात जनजागृती सप्ताह राबविणार

**गोंदिया:** प्रत्येक जीवनासाठी पाणी हा महत्त्वाचा नैसर्गिक स्त्रोत आहे.या पाण्याचे महत्त्व अधोरेखीत करुन त्याचा सर्वकाळ उपलब्धता , सुरक्षितता आणि शाश्वत वापरासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी सोमवार २२ मार्च रोजी जागतिक जल दिनानिमित्त जिल्ह्यात दि.२२ मार्च ते दि.२७ मार्च २०२१ या कालावधीत जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या कार्यक्रमाला पाणी व स्वच्छता विभगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेश राठोड, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर उपस्थित होते.

दरवर्षी २२ मार्च हा दिवस जागतिक जलदिन म्हणून सर्वत्र साजरा होतो. त्या अनुषंगाने पाण्याचे महत्व लक्षात घेऊन ते सर्वकाळ उपलब्धतेसाठी आणि शाश्वत वापरासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृतीपर असे विविध



उपक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे.

या पार्श्वभूमीवर जागतिक जल दिनाच्या निमित्ताने पाण्याचे महत्व, पाणी पुरवठ्यासाठी वापरात येणारे जलस्रोत यांचे संवर्धन, संरक्षण आणि जुन्या नादुरुस्त जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, तसेच मोठ्या प्रमाणावर होणारी योजनांमधील पाणी गळती थांबविणे गरजेचे आहे.

यासाठी पाणी शुद्धता , पाणी वाचवा , पाणी सुरक्षितता आदीबाबत विविध उपक्रम जिल्ह्यातील सर्व तालुक्यात गट विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत स्तरावर दि.२२ मार्च ते २७ मार्च २०२१ दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत.

या सप्ताहांर्तगत २२ मार्च रोजी जिल्हास्तरावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये राज्यस्तरावरून मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच तालुकास्तरावरील नियोजन बैठकीमध्ये जलप्रतिज्ञा घेऊन जलसप्ताहाचा शुभारंभ व जल प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे ,२३ मार्च रोजी ग्रामपंचायत, शाळा, अगणवाडी स्तरावर शुद्ध पाण्याचे महत्त्व समजावून सांगणे आणि सप्ताहाची व्यापकता पटवून देणे, २४ मार्च रोजी पाणी जपून वापरण्याची आवश्यकता व पद्धती डिजीटल माध्यमांचा वापर करुन समजावून सांगणे, २५ मार्च रोजी पिण्याचे पाणी तपासणीमध्ये दुषित आलेल्या स्त्रोतांचे उपाययोजना व दुरुस्तीबाबत माहिती देणे, २६ मार्च रोजी पाणी शुद्धीकरण कार्यपद्धती व टीसीएल वापर याबद्दल व २७ मार्च रोजी सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत व साठवण टाकीची स्वच्छता करणे, शुन्य गळती मोहिम, नाद–ुरुस्त स्त्रोत दुरुस्त करणे आदी उपक्रम राबविले जाणार आहेत.

दरम्यान सदरचे उपक्रम राबविताना कोरोना प्रतिबंधक नियमावलीच्या उपाययोजनेबाबत केलेल्या प्रचलित नियमानुसार व आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता ) राजेश राठोड यांनी केले आहे.